दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१४९ | बुधवार, दि.२४ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांच्या मदतीसाठी राज्याचा केंद्राकडे प्रस्ताव

## मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती, मदतीसाठी राज्य मागे हटणार नसल्याची दिली ग्वाही

मुंबई । प्रतिनिधी

**अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून राज्य सरकारने तातडीच्या मदतीसाठी यंत्रणा युद्धपातळीवर कार्यरत केली आहे. केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव पाठवण्यात येईल. पण राज्याने तातडीने मदत देणे प्रारंभ केले आहे. केंद्राची मदत मिळेलच, पण शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यासाठी राज्य सरकार कुठेही कमी पडणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**



अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत आढावा घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांना माहिती दिली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी असून घरे, शेती आणि जनावरांचे ▶▶ पान २ वर

### » आतापर्यंत शेतकऱ्यांना २ हजार २१५ कोटींची मदत मंजूर

पुढे बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २२१५ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. यापैकी १८२९ कोटी रुपये जिल्हा स्तरावर वितरित करण्यात आले असून येत्या ८ ते १० दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा होईल. तशा सूचना स्थानिक प्रशासनाला देण्यात आल्या आहेत असेही सांगितले.

### » पुन्हा अतिवृष्टीचा इशारा, प्रशासन सज्ज

हवामान खात्याने २७-२८ सप्टेंबरदरम्यान पुन्हा अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असून, नागरिक आणि शेतकऱ्यांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन सरकारने केले आहे. पूरग्रस्तांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न अखंडपणे सुरू असून, शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

### » सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये द्या – काँग्रेस

राज्यात यावर्षी सरसरीपेक्षा दुप्पट, तिप्पट पाऊस पडला आहे. ३६ जिल्हे व ३५८ तालुक्यापैकी ३० जिल्हे व जवळपास ३०० तालुके अतिवृष्टी आणि पूरग्रस्त आहेत. राज्यभरात जवळपास १४३ लाख हेक्टरवरील शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. पाऊस सातत्याने पडत असून शेतकरी हवालदिल झाला आहे. मंत्रिमंडळ बैठकीत फक्त कोरडी चर्चा झाली. सरकारने झोपेतून जागे व्हावे व संकटातील शेतकऱ्याला हेक्टरी सरसकट ५० हजार रुपये तातडीने द्यावेत व शेतजमीन खरडून गेली त्यांना हेक्टरी ५ लाख रुपये द्यावेत, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

## थोडक्यात...

### शेतकऱ्यांनी अडवला गिरीश महाजनांचा ताफा

धाराशिव : धाराशिवमध्ये मुसळधार पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे. मुसळधार पावसाने शेतातील पिकं हिरावली आहेत. तर अनेकांचं शेत वाहून गेलं आहे. या भयानक पावसात जनावरंदेखील मेली आहेत. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांच्या या व्यथा जाणून घेण्यासाठी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन हे धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेले. पण भूम तालुक्यातील चिंचपूर ढगे गावात वेगळा प्रकार बघायला मिळाला. या गावात शेकडो जनावरे वाहून गेले आहेत. त्यामुळे मंत्री गिरीश महाजन गावात पाहणीसाठी आल्यानंतर शेतकरी उद्विग्न झाले.त्यांचा ताफा अडवून समस्या मांडल्या.

### पैसे उधळण्यापेक्षा आपत्तीग्रस्तांना मदत करा

मुंबई : स्वत:च्या जाहिरातबाजीवर पैसे उधळण्यापेक्षा शेतक–यांना मदतीचा हात द्या, पंचनामे आणि नियम तपासणीत वेळ घालवू नका. तातडीने शेतक–यांच्या खात्यात आधी पैसे जमा करा मग शहानिशा करत बसा, अशी सूचनाही उद्धव ठाकरे यांनी सरकारला केली आहे. मराठवाड्यातील पूर परिस्थिती, शेती, घर, पिकांचे नुकसान या सगळ्यावर भाष्य करताना उद्धव ठाकरे यांनी सरकारवर टीका केली आहे.मराठवाड्यात अतिवृष्टी, ढगफुटी, पुराने अक्षरश: थैमान घातले आहे. आपत्तीग्रस्तांना तातडीची मदत देण्याची मागणी होत असतानाच शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारला सुनावले आहे.

### अतिवृष्टी; लातूरमध्ये शेतकऱ्याची आत्महत्या

लातूर : मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातही कोसळधार सुरू आहे. नद्या दुथडी भरून वाहत असून, शेती पाण्याखाली गेल्या आहेत. लातूरमध्ये गेल्या दहा दिवसांपासून अतिवृष्टी सुरू आहे. शेतीचे झालेल्या नुकसानीमुळे शेतक–यानं टोकाचं पाऊल उचललं आहे. राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली आहे. या घटनेनंतर माने कुटुंबावर दुखा:चा डोंगर कोसळला आहे. अतिवृष्टीने हैराण झालेल्या शेतक–यांचा आक्रोश पाहायला मिळत आहे. अशातच जळकोट तालुक्यातल्या चेरा येथील शेतक–याने टोकाचे पाऊल उचलले आहे. उत्तम माने असे अल्पभूधारक शेतक–याचे नाव असून, त्यांनी राहत्या घरात गळफास घेत आयुष्य संपवले.

### स्वस्ताईचा केवळ गाजावाजा; महागाई जैसे थे!

मुंबई/पुणे : सरकारने २२ सप्टेंबरपासून काही वस्तूंवरील जीएसटी दर कमी करण्याचा निर्णय घेतला असला, तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्याचा परिणाम त्वरित दिसणार नाही. कारण बाजारपेठेत सध्या उपलब्ध असलेला जुना माल हा आधीच्या दरांनुसारच विकला जाणार आहे. जोवर जुना माल संपत नाही, तोवर स्वस्ताई नाहीच.ग्राहकांना जीएसटी कपातीचा खरा फायदा ऑक्टोबरपासून मिळेल, असे व्यापा–यांचे मत आहे. नुकतेच राज्यातील शहरातील प्रमुख बाजारपेठांचा नागरिकांनी आढावा घेतला असता उपरोक्त वस्तुस्थिती पुढे आली. सध्या बाजारात दरकपातीचा गोंधळ आणि संभ्रम दिसून येत आहे.

### एनडीएचा जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला?

पाटना : बिहार विधानसभेची निवडणूक आता काही महिन्यांवर आली आहे. तसेच निवडणूक आयोगाकडून निवडणुकीच्या कार्यक्रमाची लवकरच घोषणा होणार आहे. दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी एनडीएमधील घटक पक्षांचे जागावाटप जवळपास निश्चित झाल्याचे वृत्त आले आहे.बिहारमध्ये एनडीएकडून जेडीयू १०२, भाजप १०१ आणि एलजेपी (आर) २०, तर हम आणि आरएलएम या पक्षांना प्रत्येकी १० जागा दिल्या जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, जागावाटपामध्ये प्रत्येक पक्षाच्या जागांमध्ये एक दोन जागांची वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे. तसेच काही ठिकाणी जागांची अदलाबदल होऊ शकते.

### लाडकी बहीण योजनेत ४,९०० कोटींचा घोटाळा

पुणे : राज्यातील तब्बल २६ लाख लाडक्या बहिणींची नावे सरकारने कमी केली आहेत. या योजनेत सुमारे चार हजार ९०० कोटी रुपयांचा महाभ्रष्टाचार झाल्याचे सरकारच्या आकडेवारीतूनच स्पष्ट होत असल्याचा गंभीर आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. पैसे पुरुषांनी काढले असे सांगितले जाते, पण हे पैसे गेले कुठे याचे उत्तर सरकारने द्यायलाच हवे, अशीही मागणी सुळे यांनी केली. आज जीएसटीचा उत्सव साजरा केला जात आहे, पण हा निर्णय जर पाच वर्षांपूर्वी घेतला असता तर उत्सवाची गरजच पडली नसती, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

## धनगर समाजाचा आज जालन्यात ऐतिहासिक मोर्चा



जालना प्रतिनिधी

महाराष्ट्रातील तीन कोटी धनगर समाज बांधवांना संविधानाने दिलेल्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी बुधवार दि.२४ रोजी जालना येथे धनगर समाजाचा आज जालन्यात ऐतिहासिक मोर्चा निघणार आहे. आरक्षणासाठी आठ दिवसांपासून उपोषणास बसलेले दिपक बोऱ्हाडे हे या मोर्चातच आंदोलनाची पुढील दिशा ठरविणार आहेत.

महाराणी अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकस्थळी आमरण उपोषणास बसलेल्या दीपक बोऱ्हाडे यांचे सातव्या दिवशी आमरण उपोषण सुरू असून, मंगळवार दि.२३ रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोऱ्हाडे यांनी मोर्चा बाबतची माहिती देताना शासन आणि प्रशासनाच्या वेळकाढू धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. भारतरत्न ▶▶ पान २ वर

## ऑगस्ट मधील नुकसानीसाठी बीड जिल्ह्यास ५६ कोटी ७३ लाखांची मदत

### माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी मानले शासनाचे आभार



मुंबई । प्रतिनिधी

**ऑगस्ट महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची मदत म्हणून राज्य सरकारने मंगळवारी १३३९ कोटी रुपयांची मदत वितरीत करण्याचा शासन निर्णय महसूल व वन विभागाच्या मार्फत निर्गमित केला असून, बीड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीच्या मदतीपोटी ५६ कोटी ७३ लाख रुपये मदत मंजूर करण्यात आली आहे.**

ऑगस्ट महिन्यात बीड जिल्ह्यात परळी तालुक्यात सर्वाधिक १०४ गावांमध्ये पिकांचे ३३% पेक्षा अधिक नुकसान झाले होते. त्यामुळे सुमारे ५४,८९० बाधित शेतकऱ्यांना जिल्ह्यात सर्वाधिक ३० कोटी १६ लाख रुपये मदत एकट्या परळी तालुक्यासाठी मंजूर करण्यात आली ▶▶ पान २ वर

## मराठवाड्यात अतिवृष्टीने आठ जणांचा बळी

संभाजीनगर

परतीच्या पावसाने धाराशिव, बीड आणि छत्रपती संभाजीनगरसह मराठवाड्यातील इतरही जिल्हांना अक्षरशः झोडपून काढले आहे. अतिवृष्टीने पिकांचे मोठे नुकसान आणि घरांची पडझड झाली आहे. पावसामुळे तीन दिवसांत ८ जणांचा मृत्यू झाला असून १० जण जखमी झाले आहेत.

पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून त्याचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. दुर्दैवी घटना घडली असेल तर तत्काळ मदत करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना दिले आहेत. याशिवाय पालकमंत्री आणि मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांकडून नुकसानग्रस्त भागाज जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# जि.प.,पं.स.निवडणूकांसाठी मतदार यादी कार्यक्रम जाहीर

### प्रारुप मतदार यादीवर ८ ते १४ ऑक्टोबर या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येणार




मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार, प्रारुप मतदार यादीवर ८ ते १४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील.

राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून, त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरली जाईल. जिल्हा परिषद निवडणूक विभाग आणि पंचायत समिती निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी ▶▶ पान २ वर

## माळ तिसरी



तृतीयेचे दिवशी अंबे
शृंगार मांडिला हो ।।
मळवट पातळ चोळी
कंठी हार मुक्ताफळां हो ।।
कंठींचीं पदकें कांसे
पीतांबर पिवळा हो ।।
अष्टभुजा मिरविती अंबे
सुंदर दिसे लीला हो ।। ३ ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

## बळीराजा वाचला नाही, तर राज्यावर मोठे संकट

### शरद पवार यांची सरकारला तात्काळ मदत करण्याची सूचना

पुणे । प्रतिनिधी



राज्यातील अतिवृष्टीमध्ये शेतातील पिके, गुरे-ढोरे व जमीनही वाहून गेली आहे. पीक, गुरा-ढोरांबरोबरच वाहून गेलेल्या जमिनीसाठीही शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी लागेल. वास्तव पंचनामे करून तातडीची व कायमस्वरूपी मदत शेतकऱ्यांना ▶▶ पान २ वर

## नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर महिलांना मिळणार २५ लाख उज्ज्वला गॅस सिलेंडर

### मोदी सरकारची मोठी घोषणा, ६७६ कोटी रुपयांचा येणार खर्च

नवी दिल्ली । वृत्तसंस्था




नवरात्रीच्या पवित्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने देशातील महिलांसाठी एक मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महिलांचे आरोग्य आणि जीवनमान सुधारण्यासाठी सरकारने प्रधानमंत्री उज्ज्वला ▶▶ पान २ वर

# आता पत्रकारांचेही 'चलो मुंबई'

## • पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील पत्रकार संघटनांचा 'चलो मुंबई'चा नारा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारकडून पत्रकार संरक्षण कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीस राज्य सरकारला भाग पाडण्याकरिता राज्यातील पत्रकार संघटनांनी आज चलो मुंबईचा नारा दिला आहे. विविध पत्रकार संघटनांनी एकत्र येत तयार केलेल्या ''पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंच'' च्या मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.**



नाशिक, त्र्यंबकेश्वर, मुंबई, अमरावती आदि ठिकाणी पत्रकारांवरील भ्याड हल्ल्याचा या बैठकीत तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न वारंवार उद्भवत असून, या संदर्भात राज्य सरकारने २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या पत्रकार संरक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नोटीफिकेशन तातडीने काढावे, असा ठराव या बैठकीत संमत करण्यात आला. सरकारने याची तातडीने अंमलबजावणी न ▶▶ पान २ वर

## विद्यार्थिनीचा विनयभंग: गटशिक्षणाधिकारी निलंबित

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्याचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर विरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यामुळे, जिल्हा परिषदेची बदनामी झाली. महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा, शर्ती, वर्तणूक नियमाचा भंग केल्याप्रकरणी बेडकरला तडकाफडकी सेवेतून निलंबित करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी मंगळवार दि. २३ रोजी काढले. केज पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५०९/२०२५ नुसार केज पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर विरुद्ध बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी विभागाने प्रास्ताविक केल्याप्रमाणे तत्काळ मंगळवारी लक्ष्मण बेडसकरच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत. दरम्यान, निलंबन कालावधीत लक्ष्मण बेडसकरला आष्टी येथे पाठविण्यात आले आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२३ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०१.०० क्विंटल | २,३०० | २,७५० | २,५९५ |
| ज्वारी/हायब्रिड: ११२.५० क्विंटल | २,१५१ | ४,१६० | २,४२५ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ९.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| उडीद : १५३.०० क्विंटल | ३,७५१ | ५,९२१ | ५,०९४ |
| बाजरी: ४९.५० क्विंटल | १,९०० | २,८६० | २,५०४ |
| मुग: २८.५० क्विंटल | ४,००० | ६,७०० | ५,४५२ |
| सोयाबीन: ८४.५० क्विंटल | ३,३०० | ४,३५० | ३,८७६ |
| हरभरा:८.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |

## अग्रलेख

# स्वप्नांवर घाला घालण्याचा प्रकार!

आपल्या मुलाला अमेरिकेत पाठवून तेथे उच्च शिक्षण देऊन नोकरी लागणे हे दिवास्वप्न अनेक भारतीय पालक पाहात असतात. त्यासाठी अक्षरशः लक्षावधी रुपयांचा खर्च त्यांना करावा लागतो. प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन आणि भल्या मोठ्या रकमेचे कर्ज घेऊन भारतीय पालक आपल्या मुलाला अमेरिकेत शिक्षणासाठी पाठवतात. साधारणपणे तेथे शिक्षण पूर्ण करणाऱ्या बहुतांश मुलांना अमेरिकेत नोकरी सहज उपलब्ध होत होती आणि त्यातून त्यांची कमाईसुद्धा बर्यापैकी होत होती. पण आता जर त्यांच्या कमाईच्या रकमेइतकीच व्हिसा फी आकारली जाणार असेल तर भारतीय पालकांचा आपल्या मुलांवर झालेला खर्च हा जवळपास वाया गेल्यातच जमा आहे.

अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने भारताचा सूड उगवण्याचे जे सत्र आरंभले आहे ते रोज एका नवीन वळणावर जाताना दिसते आहे. ५०% आयात कर वाढीनंतर या सरकारने भारतीयांच्या एच वन बी व्हिसा वरील फी सहा लाखांवरून तब्बल सुमारे ९० लाख रुपयांवर नेली आहे, हा निर्णय केवळ विकृत सूड भावनेचा निर्णय आहे हे स्पष्ट दिसते आहे. अन्यथा, सहा लाखांची व्हिसा फी ९० लाखांवर नेण्याचे दुसरे कोणतेच संयुक्तिक कारण दिसत नाही. ट्रम्प प्रशासनाने घेतलेला हा निर्णय बहुतांशी भारतीयांच्या मुळावर उठणारा आहे, याचे मुख्य कारण असे की अमेरिकेत सध्या या वर्गवारीतील व्हिसावर जे परदेशी नागरिक काम करतात त्यातील सुमारे ७२ टक्के नागरिक भारतातील आहेत. त्यामुळे या निर्णयाचा भारतीयांवरच विपरीत परिणाम होणार आहे हे उघड आहे. हा निर्णय जाहीर झाल्यानंतर ज्यांची मुले किंवा नातेवाईक अमेरिकेत या व्हिसावर गेले आहेत त्यांचे अक्षरशः धाबे दणाणले. अमेरिकेत काम करणाऱ्या भारतीय नागरिकांना वर्षाला सरासरी जितका पगार मिळतो तेवढीच रक्कम व्हिसा फी म्हणून भरणे हे केवळ अशक्य आहे. ज्या कंपन्यांनी भारतीय नागरिकांना एच वन बी व्हिसावर कामावर ठेवले आहे त्यांना ही फी भरावी लागते. कुठलीही कंपनी एवढा भयंकर आर्थिक भार सोसू शकणार नाही. त्यापेक्षा सरळ सरळ भारतीय कर्मचाऱ्याला मायदेशी पाठवणे हाच मार्ग त्या कंपन्या पसंत करतील. त्यामुळे तेथे काम करणाऱ्या भारतीयांसह सगळेच जण ट्रम्प प्रशासनाच्या या माथेफिरू निर्णयाने हवालदिल झाले होते. या अध्यादेशावर अध्यक्ष या नात्याने ट्रम्प यांनी स्वाक्षरी केल्यानंतर कंपन्यांनी भारतात सुट्टीसाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांना ईमेल पाठवून एका दिवसाच्या अवधीत अमेरिकेत परत येण्याची सूचना केल्याने अनेकांची जीवघेणी धावपळ झाली. पण त्यानंतर अमेरिकन प्रशासनाने खुलासा करून सध्या बाहेर गेलेल्या भारतीय नागरिकांना अमेरिकेत परतण्यासाठी लगेचच एवढी फी भरावी लागणार नाही किंवा त्यांचा व्हिसा रद्द केला जाणार नाही असे स्पष्ट केले, पण तोपर्यंत मात्र ज्यांची धावपळ झाली त्यांचे नुकसानच झाले. आता अमेरिकन प्रशासनाने आपल्या घोषणेबाबत पुन्हा एकदा स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की, व्हिसा फी मध्ये करण्यात आलेली ही वाढ, सध्या ज्यांना व्हिसा मिळालेला आहे त्यांच्यासाठी लागू नसून ज्याला एचवन बी नव्याने मंजूर केला जाईल त्यांच्यासाठी ही वाढीव फी असेल. या निर्णयामुळे सध्या या व्हिसा वर अमेरिकेत कार्यरत असलेल्या भारतीय नागरिकांनी सुस्कारा सोडला हे खरे आहे पण त्यांच्या व्हिसाची मुदत संपल्यानंतर नूतनीकरणाच्या वेळी त्यांना एवढी फी भरावी लागणार आहे किंवा कसे याविषयीसुद्धा अजून संदिग्धता आहे. नवीन एचवन बी साठी इतकी मोठी रक्कम आकारण्याचा निर्णयसुद्धा भारतीय विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी मोठे संकटच ठरणारा आहे, कारण भविष्यातील मोठ्या पगाराच्या नोकरीसाठी अमेरिकेत एमएसचे शिक्षण घेण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांना ट्रम्प सरकारच्या या नव्या धोरणामुळे नोकरी मिळण्याची कोणतीच शाश्वती उरलेली नाही. त्यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना सक्तीने मायदेशीच परतावे लागणार आहे.

ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाला खुद्द अमेरिकेतूनच विरोध झाला असून या निर्णयाला आता तेथील नागरिक आणि कंपन्यांनी कायदेशीर आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे अशा बातम्या आल्या आहेत. आतापर्यंत भारतीय नागरिक अशा समजात होते की, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात खूप व्यक्तिगत मैत्री आहे. पण प्रत्यक्षात ट्रम्प हे भारताचे शत्रू असल्यासारखेच वागत आहेत. ट्रम्प प्रशासनाच्या अशा निर्णयांना मोदी सरकारकडून खमका विरोध किंवा प्रतिवाद केला जात असल्याचे दिसत नाही. भारतातील मोदी सरकार ट्रम्प यांच्या बाबतीत इतक्या बचावात्मक पद्धतीने का वागते याचाही उलगडा अजून झालेला नाही. व्हिसाबाबतच्या निर्णयाचे विश्लेषण करताना काही महाभागांनी असे तारे तोडले आहेत की, हा निर्णय म्हणजे भारतासाठी एक मोठी संधीच ठरणार आहे कारण, भारताबाहेर गेलेली ही सगळी प्रज्ञा आता पुन्हा भारतात परत येणार असल्याने त्याचा भारताला विकासासाठी उपयोग करून घेता येईल. हा भंपक स्वरूपाचा युक्तिवाद आहे. अमेरिकेइतका पगार किंवा आर्थिक लाभ या लोकांना भारतात मिळणार आहे का, या प्रश्नाचे त्यांच्याकडे उत्तर नाही. अमेरिकेकडे जाणारा प्रज्ञा ओघ थांबला आणि तो भारतातच राहिला तर त्यांच्यासाठी भारत सरकार नेमक्या काय सोयीसुविधा उपलब्ध करून देणार आहे याची कोणतीही शाश्वती नाही. त्यामुळे कारणमीमांसा काहीही केली जात असली तरी ट्रम्प प्रशासनाचा हा निर्णय भारतावर घाला घालणाराच आहे.

## गायरान धारकांच्या नावे जमिनी करण्यासाठी राज्यभर लढा उभा करणार-पप्पू कागदे

# गायरान धारकांच्या न्याय हक्कासाठी आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

**राज्यासह जिल्हाभरात कसत असलेल्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी व कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने आज दि.२३ सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन भव्य रॅली काढून, जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे आंदोलनास सुरुवात करण्यात आली.**

केंद्रिय मंत्री रामदास आठवले दलित पँथरच्या माध्यमातून कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा केला. राज्याचे समाज कल्याण मंत्री असतांना १४ एप्रिल १९९० ला शासन परिपत्रक (शासन जी.आर.) लागू केला. त्यामुळे लाखो हेक्टर गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करुन त्यांना उपजीविका भागविण्याचे साधन निर्माण करुन दिले.गायरान जमिनी नावे करण्यासाठी गायरान धारकांनी मुळ कागद पत्रांसह आपले प्रस्ताव वेळो-वेळी महसूल विभागाकडे सादर केलेली आहेत. परंतू शासनाच्या गळचेपी धोरणांमुळे गायरान जमिनी नावे होण्यासाठी विलंब होत आहे. अठरापगड जातीच्या समाज बांधवांच्या न्याय व हक्कासाठी काम करणारी चळवळ रिपब्लिकन पक्षाची आहे. आम्ही रिपाइंच्या माध्यमातून आजपर्यंत जिल्ह्यातील गायरान धारकांच्या नावे दोन हजार एकर जमीन करून सातबारा वाटप केले आहेत, व पाच हजार एकर गायरान जमिनीवर नविन अतिक्रमण करण्यात आले आहे. हे रिपाइंच्या आंदोलनाचे मोठे यश आहे. कसत असलेल्या



गायरान जमीन व नवीन अतिक्रमणित जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी १९९० च्या शासन जीआर नुसार गायरान धारकांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. भूमिहीन गायरान धारक, शेतमजूर, ऊसतोड कामगार यांना प्रति महिना ३००० रुपये मानधन देण्यात यावे. गायरान धारकांच्या ७/१२ व ८-अ उतारा क्षेत्रावर असणारे पोट खराब क्षेत्र काढण्यात यावे.१९९० च्या शासन परिपत्रकास २०१५ पर्यंत मुद्दत वाढ देण्यात यावी. या प्रमुख मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी जिल्हा रिपाइंच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर महाधरणे आंदोलन करण्यात आले. आगामी काळातही गायरान धारकांना हक्काच्या जमिनी मिळवून देण्यासाठी रिपाइंच्या वतीने राज्यभर गायरान धारकांचा लढा उभा करणार आहे.

यावेळी राजू जोगदंड, मझर खान, किसन तांगडे, किशोर कांडेकर,सुशिलाताई मोराळे, अशोक साळवे दिपक कांबळे, महादेव उजगरे, थोडीराम सिरसट, सचिन कागदे, हरिश मस्के मायाताई मिसळे, राणी गायकवाड, सलमा पठाण, शोभा गलांडे, दशरथ सोनवणे, सादेक पठाण,गोवर्धन वाघमारे, बापू पवार, शाहु डोळस, अरुण निकाळजे, लक्ष्मण सिरसट, दशरथ शिंदे, महेश आठवले, सादेक कुरेशी, विजय चांदणे, दिलिप बन्सोडे, रविंद्र जोगदंड, गौतम बचुटे, विलास वाघमारे, प्रमोद दासूद, दिपक कांबळे, मिलींद तरकसे, सुरज काळे, निलेश ढोबळे, राहुल सरवदे, भगवान ससाणे, गणेश लांडगे, राहुल वाघमारे,राजकुमार सोनवणे, विजय डावरे, हरीश जावळे, कपिल जावळे, किशोर जावळे, विजय जाधव, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, नागेश दुबळे,भैय्या मस्के, संभाजी गायकवाड, भैय्या साळवे, संजय हनवते, सचिन वडमारे,पप्पू वाघमारे, सुभाष तांगडे, सतिष सिनगारे, राजाभाऊ वक्ते, शाम वीर , अक्षय कोकाटे, धम्मा पारवेकर, नामदेव वाघमारे, देवानंद वाघमारे अशोक दळवी, भैय्यासाहेब साळवे, भाऊसाहेब दळवी, दिलीप खंदारे, सुभाष पारवे, रामदास मस्के, मनोज बोराडे, महेंद्र वडमारे, बाळासाहेब गव्हाणे, भाउसाहेब कांबळे, भास्कर जावळे, सोनू वडमारे, जितेंद्र खरात, मोहन वक्ते, यांच्यासह हजारो गायरान धारक, महीला, व रिपाइं कार्यकर्ते महाधरणे आंदोलनात सामील झाले होते. राज्यासह जिल्हाभरात कसत असलेल्या गायरान जमिनी गायरान धारकांच्या नावे करण्यासाठी रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष मंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपाइंचे शिष्टमंडळ येत्या १५ दिवसात राज्याचे मुख्यमंत्री व महसूलमंत्री यांना भेटणार आहे.

## पान ६ वरून...

### सुरूमगावात पुराच्या

येथील लोकांचे संसार उघड्यावर आले आहेत.या गावातील वृद्ध,महिला,पुरूष लहान मुले गाव सोडुन सुरक्षित स्थळी जाण्यासाठी बाहेर निघाले आहेत. तालुक्यातील नदी काठावरील गावात पाणी शिरले आहे. या पुराचा सर्वाधिक फटका माजलगाव तालुक्यातील गावांना बसला आहे. त्याचसोबत अनेक गावांना पाण्याने वेढा घातल्याने या गावांचा संपर्क तुटला आहे. सुरूमगांव येथील नागरिकांची राहण्याची सोय सुरक्षित स्थळी गंगामसला येथील मोरेश्वर महाविद्यालयात केली असल्याचे सरपंच शिवकुमार माने यांनी सांगितले.आजच्या पूर परिस्थितीचा आढावा घेऊन प्रशासनाने योग्य ती पावले उचलणे गरजेचे बनले आहे.

-------------

### सिरसमार्ग मोसंबी

सौदे चालू आहेत. अशी परिस्थिती असताना गेल्या चार दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीने सिंदफणा, डोंबरी व विद्रुपा या नद्यांसह इतरही ओढ्यांना महापूर आला आहे. या पुरामुळे दोन ते तीन किमी रुंद पात्रात पाणीच पाणी झाले आहे. साक्षाळपिंपरी (ता.बीड) ते सिरसमार्ग, हिरापूर या पंधरा ते वीस किमी अंतरातील मोसंबी फळबाग, कापूस, सोयाबीन, ऊस, तूर व इतर पिके पूर्णपणे वाया गेली आहेत. सिरसमार्ग व परिसरात कापूस व ऊस पिकही चार हजार एकरवर आहे. गेल्या चार दिवसांपासून झालेल्या अतिवृष्टीने पूर्ण पिक महापुराच्या पाण्याने झाकून गेले आहे. कापूस व सोयाबीन आता काढणीला आले होते. दसर्यापासून कापूस वेचणीला सुरूवात होते तर महिनाभरात ऊस तोडणीला आलेला आहे. अशी परिस्थिती असताना कापूस पूर्ण वाया गेला आहे तर ऊसही पाण्याने आडवा झाला आहे. यासह खरीपाच्या इतर पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. गेल्या दोन वर्षातील दुष्काळ व यंदा चांगले पीक येऊनही सिंदफणा माय कोपल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट आले आहे. अजुनही पावसाचे वातावरण असल्याने शेतकर्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

-------------

### संपूर्ण गेवराई मतदारसंघात

शेतात उभे असलेले पीक पूर्णतः पाण्याखाली झाकून गेले आहे कित्येक गावांमध्ये घरात पाणी घुसले असून शेतजमीनही वाहून गेली आहे. पशुधनाचेही नुकसान झाले आहे. तालुक्यातला शेतकरी हातबल झाल्याचे दिसत आहे. याच परिस्थितीत माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी गेवराई मतदार संघातल्या अनेक गावांमध्ये भेटी देऊन शेतकऱ्यांशी आणि गावकऱ्यांशी संवाद साधला. दिनांक २३ सप्टेंबर रोजी हिरापूर खामगाव नांदूर हवेली आधी गावांमध्ये जाऊन बदामराव पंडित यांनी पूर परिस्थितीची पाहणी केली. अनेक गावातील अडचणी संदर्भात तहसीलदार आणि महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांशी मोबाईल वरून संपर्क साधत शेतकरी आणि गावकऱ्यांना मदत करण्याच्या सूचना केल्या. शेतकऱ्यांशी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, गेवराई विधानसभा मतदारसंघात अतिवृष्टी झाल्याने सर्वच शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले आहे परंतु कोणीही घाबरू नये आपल्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे शासनाकडून तात्काळ भरीव मदत शेतकऱ्यांना कशी मिळेल यासाठी माझे पूर्ण प्रयत्न राहतील. नेहमीप्रमाणे याही संकटातून आपण बाहेर पडू असे म्हणत शेतकऱ्यांना धीर दिला. यावेळी गावकऱ्यांनी आपल्या घराचे आणि शेतीचे झालेले नुकसान बदामराव पंडित यांना दाखवून शासनाकडून तात्काळ मदत मिळवून देण्याची विनंती केली. यावेळी त्यांच्यासोबत शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, मिलिंद वाघमारे, सुनील कांडेकर यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

-------------

### शेतकऱ्यांना १० हजार

बुजल्या आहेत. त्यांना पाच लाख रुपये अनुदान द्यावे अशीही मागणी त्यांनी केली आहे. राज्यात गेल्या काही दिवसात अतिवृष्टीमुळे पूरस्थिती उद्भवली असून अनेक ठिकाणी पिकांचं नुकसान झालं आहे. तसचं पशुधन वाहून घेलं असून घरांचही नुकसान झालं असल्यानं राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा शेतकऱ्यांना हेक्टरी दोन लाख रुपयांची मदत द्यावी तसेच पुढच्या काही दिवसात राज्यात आणखी पावसाचा अंदाज असून अतिवृष्टीचा इशारा असलेल्या भागात जीवित आणि वित्तहानी रोखण्याच्या दृष्टीनं पावलं उचलावी असंही धोंडे यांनी म्हटल आहे.

-------------

### डॉ.योगेश क्षीरसागर शेतकऱ्याच्या

जाहीर करण्यासंदर्भात ते निर्णय घेतील, अशी माहिती डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांशी बोलताना दिली. त्यांनी पुढे म्हटले की, पूरस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळावी यासाठी सरकार हालचाल करत आहे. ऑगस्टमधील नुकसानीसाठी ५६ कोटी रुपयांचे अनुदान जिल्ह्याला मिळाले आहे. सप्टेंबरमधील पंचनामे पूर्ण होताच मदत दिली जाणार आहे, असेही डॉ.क्षीरसागर म्हणाले. डॉ.सारिका क्षीरसागर यांची बीड, शिरूर कासार तालुक्यातील गावांमध्ये पाहणी डॉ.सारिका क्षीरसागर यांनी बीड तालुक्यातील राजुरी, बहादरपूर, साक्षाळपिंपरी तसेच शिरूर कासार तालुक्यातील कमलेश्वर धानोरा आदी गावांमध्ये नुकसानग्रस्त शेती, रस्त्यांची पाहणी केली. दरम्यान, आज (दि. २४) त्या गात शिरापूर, हाजीपुर, गाजीपूर, आर्वी, फुलसांगवी व मार्कडवाडी या गावांना भेट देणार आहेत.

-------------

### महाड जवळा परिसरात

लागली आहेत. त्यामुळे आता कापूस ही सुकू लागला आहे. कापसाला आलेली बोंडे आणि पाते सुकून गळू लागली आहेत. म्हाळस जवळा परिसरात असलेल्या टुकूर नदीला मोठ्या प्रमाणात पूर आल्याने नदीकाठची घरे उध्वस्त झाली असून या भागात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी घुसल्याने सोयाबीन जागेवरच सडून गेले आहे. त्यामुळे आता हे पीक हाती लागण्याची शाश्वतीच राहिली नाही. बाजरीचे पीक उत्तम आले होते. मात्र वाऱ्यामुळे बाजरी आडवी झाल्याने आता त्याचाही शेतकऱ्यांना फारसा उपयोग होणार नाही. बाजरीची कणसे पाण्यात बुडाल्याने त्यालाही आता कोंब येऊ लागले आहेत. या परिसरात कापूस मोठ्या प्रमाणात पिकवला जातो. शेतात पाणी असल्याने कापसाची मुळे आता सडू लागली असून थोड्या फार प्रमाणात आलेली कापसाची बोंडे आणि पाते ही आता गळू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाती आता काही लागेल याची शाश्वती दिसत नाही. प्रशासनाने या सर्व बाबींची पाहणी करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी या परिसरातून शेतकऱ्यांनी केली आहे.

-----------

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या मदतीसाठी

जिथे नुकसान झाले आहे तिथे आवश्यक त्या ठिकाणी निकषामध्ये शिथिलता आणून मदत केली जाईल. पूरग्रस्त भागांतील पंचनामे पूर्ण होताच तातडीने मदत पोहोचवली जात आहे. ज्या तालुक्यांचे पंचनामे पूर्ण होतात, तिथे त्वरित आर्थिक सहाय्य वितरित केले जाते. एकत्रित शासन आदेशाची वाट न पाहता, पंचनामे येतील तसे जीआर काढण्यात येत आहेत. मदतकार्य कुठेही थांबलेले नाही . मृत्यू, जनावरांचे नुकसान, घरांचे नुकसान यांसारख्या दुर्दैवी घटनांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने मदत वितरित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. स्थानिक पातळीवरही नुकसानग्रस्तांना त्वरित दिलासा देण्यासाठी प्रशासनाला पूर्ण सूट देण्यात आली असून, निधीची कमतरता भासणार नाही, याची खबरदारी घेण्यात आल्याचेही सांगितले. पुढे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, धाराशिव, अहमदनगर, जळगाव, सोलापूर, बीड, परभणी आदी जिल्ह्यांत गेल्या काही दिवसांत अतिवृष्टीमुळे शेती आणि घरांचे मोठे नुकसान झाले. या भागांत एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या १७ तुकड्या बचावकार्यात गुंतल्या आहेत. अनेकांना हेलिकॉप्टरद्वारे सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. स्थलांतरित नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, अन्नधान्य आणि निवाऱ्याची व्यवस्था सरकारने केली आहे. पूरामुळे जमिनी खरडून गेल्याच्या तक्रारींवर सरकार सकारात्मकपणे मदत करेल असेही स्पष्ट केले. काही भागांत अजूनही पाणी ओसरलेले नसल्याने स्थलांतरित नागरिकांना घरी परतता येत नाही. त्यांच्यासाठी सर्व व्यवस्था सरकार पुरवत आहे. सर्व पालकमंत्र्यांना पूरग्रस्त भागांना भेटी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

-------

### ऑगस्ट मधील नुकसानीसाठी बीड

असल्याची माहिती माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी सोशल मीडिया पोस्ट व्दारे सांगितली आहे. ऑगस्ट महिन्यात झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर धनंजय मुंडे यांनी संपूर्ण स्थानिक प्रशासन व सर्व गट-गण प्रमुख यांची एकत्रित बैठक घेऊन गावनिहाय नुकसानीचा आढावा घेऊन त्यानुसार पंचनम्याचे अहवाल शासनास सादर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यानुसार सादर अहवालानुसार ही मदत मंजूर करण्यात आली आहे. दरम्यान, या मदतीचे तातडीने सबंधित शेतकऱ्यांना वितरण करण्यात येणार असून, धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्यासह राज्य शासनाचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच सध्या सप्टेंबर महिन्यात सुरू असलेली परिस्थिती अत्यंत विदारक असून, शेती पिके, कुटुंबे, घरे, गावे यांची प्रचंड वाताहत झाली आहे; राज्य सरकारच्या वतीने या संपूर्ण परिस्थितीची दखल घेतली जाईल व १००% नुकसान भरपाई दिली जाईल, असा विश्वासही मुंडे यांनी व्यक्त केला आहे.

------------

### धनगर समाजाचा आज

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात ३६ नंबरला अनुसूचित जमाती प्रवर्गात धनगर समाजास आरक्षण दिले, मात्र राज्यकर्त्यांनी ते बंद करून ठेवले असून याच्या मुक्तीसाठी आपण मुक्तिसंग्राम सुरू केला असल्याचे दीपक बोऱ्हाडे यांनी नमूद केले. २०१४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ढोल वाजवून धनगर समाजाला कॅबिनेटच्या पहिल्या बैठकीत आरक्षण देतो असे सांगितले होते. देवा भाऊंना धनगर समाजाने भरभरून मते दिले. मात्र त्यांना त्याचे उपकार फेडावे असे वाटत नाही. याबद्दल दीपक बोऱ्हाडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला एनटीसीचे एसटीसी करून शब्द पाळावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी आदिवासी नेते आणि बांधवांनी वैयक्तिक स्वार्थ अथवा राजकीय अजेंडा न पाहता आमचे संवैधानिक हक्क आम्हाला मिळू द्यावेत, अशी साद बोऱ्हाडे यांनी घातली.

------------

### जि.प.,पं.स.निवडणूकांसाठी

८ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध होईल. या यादीवर १४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील, तर अंतिम मतदार यादी आणि मतदान केंद्रनिहाय यादी २७ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहीर होईल. निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या तयार करताना विधानसभा मतदार यादीप्रमाणेच मतदारांची नावे व पत्ते कायम ठेवले जातात. या यादीत नवीन नावे समाविष्ट करणे, नावे वगळणे किंवा नावे-पत्त्यांमध्ये दुरुस्ती करणे यासारखी कार्यवाही आयोगाकडून केली जात नाही. हरकती व सूचनांद्वारे केवळ लेखनिकांच्या चुका, मतदाराचा निवडणूक विभाग किंवा निर्वाचक गण चुकून बदलणे, किंवा विधानसभा यादीत नाव असूनही प्रभाग यादीत नाव नसणे यासारख्या त्रुटी दुरुस्त केल्या जाणार आहेत. काही दिवसांपूर्वीच ३४ जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदांचे आरक्षण जाहीर झाले आहे. ठाणे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित आहे, तर छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्षपद सर्वसाधारण गटासाठी खुले आहे. यासह उपाध्यक्ष आणि सभापतींचे आरक्षणही सरकारने जाहीर केले आहे.

----------

### नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर महिलांना

योजने अंतर्गत आणखी २५ लाख गॅस सिलेंडर मोफत देण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे ग्रामीण आणि गरीब कुटुंबातील महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे. लाकडी चुलीमुळे होणाऱ्या धुरापासून महिलांच्या आरोग्याला होणारा धोका कमी करणे आणि त्यांना स्वच्छ इंधन उपलब्ध करून देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे.

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेने एक मोठा टप्पा गाठला आहे. गेल्या नऊ वर्षांत या योजनेअंतर्गत देशभरातील १०.५८ कोटी कुटुंबांना एलपीजी गॅस कनेक्शन देण्यात आले आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने नुकतीच ही माहिती दिली असून, या यशामुळे महिलांना स्वच्छ इंधन उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट पूर्ण होत असल्याचे दिसत आहे. या योजनेंतर्गत नुकतेच आणखी २५ लाख नवीन लाभार्थ्यांना जोडण्यात आले आहे. यासाठी ६७६ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. २०१६ मध्ये भारत सरकारने ही योजना सुरू केली होती. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांमधील महिलांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. योजनेअंतर्गत, सरकार मोफत एलपीजी सिलेंडर, एक भरलेला गॅस सिलेंडर आणि शेगडी देते. या योजनेचा उद्देश केवळ गॅस कनेक्शन देणे नाही, तर महिलांचे जीवनमान उंचावणे हा आहे.

**महिला सशक्तीकरणासाठी महत्वाचे पाऊल**

उज्ज्वला योजना महिला सशक्तीकरणासाठी एक गेम चेंजर ठरली आहे. पारंपरिक लाकडी चुलीमुळे होणाऱ्या धुराच्या त्रासातून या योजनेने महिलांची सुटका केली आहे. यामुळे महिलांच्या आरोग्याला होणारे धोके कमी झाले आहेत. धुरामुळे श्वसनाचे आणि डोळ्यांचे आजार होण्याचा धोका कमी झाला आहे. याव्यतिरिक्त, गॅसवर स्वयंपाक केल्यामुळे महिलांचा वेळ वाचतो. हा वाचलेला वेळ त्या इतर सामाजिक आणि आर्थिक कामांसाठी वापरू शकतात.

--------

### बळीराजा वाचला नाही, तर

द्या. शेतकरी पुन्हा उभा कसा राहिल, याकडे लक्ष द्या. बळीराजाच वाचला नाही, तर राज्यावर मोठे संकट येईल, अशी भिती व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्य सरकारला अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ मदतीचा हात देण्याच्या सूचना केल्या आहेत. पवार हे मंगळवारी पुणे दौऱ्यावर होते. माध्यमांनी पवार यांच्याशी संवाद साधल्यानंतर पवार यांनी पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीची माहिती देत उपाययोजना सुचविल्या. पवार म्हणाले, ''राज्यात अशी अतिवृष्टी कधी पाहिली नाही. सोलापूर, लातुर, धाराशीव, जालना, नांदेड, परभणी व दक्षिण नगर या ठिकाणी नेहमी कमी पाऊस होतो, तिथे आता अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्तीवेळी साहाय्य करण्याची केंद्र सरकारची योजना आहे. त्या योजनेतून राज्यामार्फत केंद्राने मदत पोचविली पाहीजे. अतिवृष्टीमुळे उभी पिके गेली, गुरे-ढोरे व जमीनही वाहून गेली आहे. पीक गेले तर एक वर्षाचे नुकसान होईल, पण जमीन वाहून गेली तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा मार्ग थांबतो. गुरे-ढोरे वाहून गेल्यामुळे शेतीपुढे समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्य सरकारने गतीने काम करण्याची गरज आहे, असे ते म्हणाले.

**गोरक्षकांवर कडक कारवाई करा**

गोरक्षकांच्या नावाने शेतकऱ्यांना यातना दिल्या जात आहेत. गोरक्षक म्हैस, गाई, बैल घेऊन ते अन्य कामासाठी वापरत आहेत. शेतकरी त्यांचे पशुधन वाचवायचे कसे, या चिंतेत आहेत. असे असताना मदत करण्याऐवजी त्यांचे पशुधन अन्य कारणांसाठी ताब्यात घेऊन स्वतःला गोरक्षक म्हणून घ्यायचे, असे प्रकार सुरू आहेत, सरकारने या गोरक्षकांविरुद्ध कडक कारवाई केली पाहीजे, अशा शब्दात पवार यांनी गोरक्षकांचा समाचार घेतला.

---------

### आता पत्रकारांचेही

केल्यास टप्प्या टप्पयानं आंदोलनाची धार वाढवत नेण्याचा निर्णय घेण्यात आला.. त्यानुसार येत्या ११ ऑक्टोबरपासून यासाठी राज्यव्यापी आंदोलन छेडण्यात येणार असून ११ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांना हजारो एस.एम. एस पाठवून त्यांचे लक्ष पत्रकारांच्या मागण्यांकडे वेधले जाईल.. त्यानंतर २५ नोव्हेंबर रोजी आझाद मैदानावर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येईल.. त्यामध्ये महाराष्ट्रातील किमान ५००० पत्रकार सहभागी होतील.. त्यासाठी 'चलो मुंबई'चा नारा या बैठकीत देण्यात आला आहे. या बैठकीस अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, विश्वस्त राही भिडे, परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, राजा अदाटे , शरद पाबळे, परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टिवकर, ज्येष्ठ संपादक महेश म्हात्रे, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे सुजित महामुलकर, मुंबई क्राइम रिपोर्टर असोसिएशनचे विशाल सिंह, डिजिटल मिडिया परिषदेचे गणेश जगताप, युवराज जगताप, सुनील ह. विश्वकर्मा, अजय मगरे, जर्नालिस्ट युनियन ऑफ महाराष्ट्राचे राजेंद्र साळसकर आदि पत्रकार उपस्थित होते. सरकारला जाग आणण्यासाठी येत्या ११ ऑक्टोबरपासून राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा निर्णय घेण्यात आला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना राज्यभरातून पत्रकार लाखोंच्या संख्येने एसएमएस पाठवून पत्रकार संरक्षण कायद्याची अंमलबजावणी करावी, अशी विनंती करणार आहेत. त्यानंतरही सरकारचे डोळे उघडले नाहीत, तर संविधान दिनाचे औचित्य साधून आझाद मैदान येथे एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करणार आहेत आणि यासाठी राज्यभरातील पत्रकार मुंबईत धडकतील, असा निर्णय यावेळी घेण्यात आला.

---------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. २४ सप्टेंबर २०२५





माजलगाव:- तालुक्यातील गोदावरी नदीपात्रात माजलगाव धरण व पैठण धरणाचे २ लाख १८ हजार क्युसेकने विसर्ग सोडल्याने गोदावरी नदीकाठच्या गावांत पुर परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.तालुक्यातील सोन्नाथडी येथे पुर परिस्थितीची पाहणी करून माहिती घेताना माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले,ग्राम महसूल अधिकारी रुपचंद आभारे

# शेतकऱ्यांना तत्काळ मदत करा, ओला दुष्काळ जाहीर करा - मयंक गांधी

## शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची घेतली भेट; अंबाजोगाई उपविभागीय अधिकाऱ्यांनाही शेतकऱ्यांचे निवेदन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ, अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने नुकसान झालेच आहे. त्याबरोबरच संपूर्ण बीड जिल्हा आणि मराठवाड्यातही शेतकरी संपूर्णतः कोसळला आणि कोलमडला आहे. ऐन दसरा आणि दिवाळीचा सणासुदीचा काळ समोर असताना संकटाच्या गर्तेत सापडलेल्या शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत करावी तसेच मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी तीव्र मागणी ग्लोबल विकास ट्रस्टचे अध्यक्ष मयंक गांधी यांनी शासनाकडे केली आहे. अंबाजोगाई तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रहास्तव उपजिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. यावेळी हजारो शेतकरी उपस्थित होते, तर याच सर्व मागण्या आणि इतर अनेक मागण्या घेऊन जिल्हाधिकारी यांच्या दालनात अनौपचारिक बैठक संपन्न झाली. या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी उपस्थित होते.



ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक गावांत जाऊन जलनायक मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांशी चर्चा केली. त्यांच्या अडचणी आणि व्यथा समजून घेतल्या. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी संपूर्णतः खचले आहेत. कोणाचे पिके गेली, गुरे - जनावरे गेली, शेतातील साहित्य वाहून गेले तर कोणाची राहती घरे पडली आहेत. या संपूर्ण नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत व तत्काळ मदत जाहीर करावी. पाण्याने वाहून गेलेल्या जमिनीला आर्थिक मदत दिल्यानंतर त्या जमिनीची पोटखराब क्षेत्र म्हणून ७/१२ वर नोंद घेऊन नये तसेच संपूर्ण मराठवाड्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी आग्रही मागणी जलनायक मयंक गांधी यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात शेकडो शेतकऱ्यांना घेऊन अंबाजोगाई उपजिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन निवेदन देण्यात आले तर जिल्हाधिकारी बीड यांच्या दालनात अप्पर जिल्हाधिकारी आणि निवासी जिल्हाधिकारी यांच्या समवेत अनौपचारिक बैठक घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यात आले. झालेल्या बैठकीनंतर शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल तसेच शासनाला झालेल्या नुकसानीबाबत वस्तुनिष्ठ अहवाल देण्यात येईल असे आश्वासन जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

### दसरा-दिवाळीपूर्वी मदत करा-मयंक गांधी

ऐन सणासुदीच्या काळात अतिवृष्टी झाली आणि सर्वच आनंदावर विरजण पडले. शेतातील उभे पिक तर पाण्याने गेलेच, मात्र सुपीक मातीही वाहून गेल्याने जमीनच राहिली नाही. अशा अवस्थेत शेतकऱ्यांनी जगायचे कसे? असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाने ही बाब गांभीर्याने घेऊन दसरा आणि दिवाळी पूर्वी भरीव आर्थिक मदत तत्काळ द्यावी यासंदर्भात उद्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन मागणी करणार असल्याचे मयंक गांधी यांनी म्हटले आहे.

# हिंदी भाषा भारतीय एकात्मतेचे प्रतीक आहे -डॉ.न.पु.काळे

पाटोदा । प्रतिनिधी

**भारतीय भाषांमध्ये हिंदी ही एक राजभाषा म्हणून संविधानामध्ये नोंदवली गेली आहे. जगाच्या पाठीवर तिसऱ्या क्रमांकावर बोलल्या जाणाऱ्या हिंदी भाषेचा गौरव दिन म्हणून सप्टेंवर आपल्याकडे हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. देश विदेशात आता हिंदी भाषिक मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. नामवंत हिंदी साहित्यिकांनी मोठ्या प्रमाणावर हिंदी मध्ये लेखन केले आहे. हिंदी भाषा ही भारतीय एकात्मतेचे प्रतीक आहे.'' असे प्रतिपादन व्ही पी महाविद्यालय, पाटोदा येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ.न पु काळे यांनी केले.**

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथे हिंदी दिनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. काळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा सोमनाथ घाडगे होते. यावेळी अध्यक्ष स्थानावरून ते म्हणाले, ''आपण सगळ्याच भाषेचा सन्मान केला पाहिजे. आपली भाषा, संस्कृती, रीती रिवाज याचा प्रत्येकाला गर्व असायला हवा. आम्हाला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा आली पाहीजे त्यातून विद्यार्थ्यांचा भाषिक विकास होण्यास खूप मदत होते आहे. समाजात सामाजिक अभिसरणाचे काम भाषा करत असते. भाषे मुळे समाज एक संघ राहतो.''हिंदी दिनाच्या निमित्ताने विचारपीठावर हिंदी विभाग प्रमुख डॉ वंदन जाधव समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ सुनील जाधव अंतर्गत गूणवंता हमीं कक्षा चे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा विनोद किर्दक यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा कीर्दक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की भाषेला सौंदर्य असते कोणत्या ही भाषे च्या प्रति कठोरता नसावी चांगला माणुस बनण्या साठी आपला संवाद चांगला राहणे आवश्यक आहे संभाषण जीवनाचा अविभाज्य घटक आहे या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शेख खैसर यांनी केले. यावेळी कु औटे पुजा कु भक्ति कोल्हे ,यानी बनवलेल्या युवा स्पंदन भितीपत्रकाच पाहुण्याच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन कु वारभुवन आणि धरती मस्के यांनी केले व आभार हि विभाग प्रमुख डॉ वंदन जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ सुनील जाधव , डॉ काकडे शिवाजी , डॉ किवणे डॉ प्रधान रामकृष्ण डॉ लोखंडे बी बी प्रा पापाजी चव्हाण विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेत सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे यश

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी नोंदवला.यामध्ये मॉडेल व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेत घवघवीत यश मिळवले असून 'केंद्रीय आविष्कार स्पर्धा २०२५' स्पर्धेसाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सावरकर महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धा आयोजित करण्यातआली होती.स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला.यामध्ये मॉडेल व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील विद्यार्थी मोमीन अमन याने 'चालकांसाठी डोळे मिटण्याच्या प्रणालीसाठी स्मार्ट मॉनिटरिंग सिस्टीम' या मॉडेल साठी तृतीय पारितोषिक तर तृप्ती सावंत या विद्यार्थिनीला 'सौरऊर्जा ठिबक सिंचन' प्रकल्पासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.यशस्वी दोन्ही विद्यार्थ्यांची निवड 'केंद्रीय आविष्कार स्पर्धा २०२५' स्पर्धेसाठी झाली.

भौतिकशास्त्र विभागातील प्रा. ओमप्रसाद सारगे यांची महाविद्यालय आविष्कार समन्वयक म्हणुन निवड करण्यात आली होती. स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना प्रा. ओमप्रसाद सारगे, प्रा.उमेश राठोड तसेच प्रा.जावेद चाऊस,शेख मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थ्यांचे म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ.जी.के. सानप,प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे यांनी अभिनंदन केले व केंद्रीय आविष्कार स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# राजकारणात आता बेरजेचे नाही तर गुणाकाराचे गणित करण्याची वेळ, पंकजा मुंडेंचे परखड भाष्य

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथे भगवान बाबांच्या जयंतीनिमित्त आयोजित शिवपुराण कथेदरम्यान पंकजा मुंडे यांनी उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी राजकारणातील बदललेल्या समीकरणांवर भाष्य करताना बेरजेऐवजी गुणाकाराचे गणित करण्याची गरज व्यक्त केली. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. तसेच, त्यांनी जातपात विसरून सर्वांसाठी काम करण्याची भूमिका स्पष्ट केली आहे.



पाटोदा तालुक्यात राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यानी उपस्थितांना संबोधित केले. पंकजा मुंडे यांनी बदलत्या राजकीय समीकरणांवर भाष्य करताना म्हटले की, राजकारणात आता बेरजेचे नाही तर गुणाकाराचे गणित करण्याची वेळ आली आहे.पंकजा मुंडे म्हणाल्या की, वीस वर्ष राजकारणात काम करत असताना २२ वर्षे समाजकारणात काम करत असताना लोकांनी मला साथ दिली. जेव्हा संयमाने वागायचं असतं तेव्हा संयमानी वागायचं, पण जेव्हा काही होईल तेव्हा हातातील तलवार काढायची. माणसांनी बेरजेचं गणित कराव असं मुंडे साहेब मला नेहमी सांगायचे. मात्र आता गुणाकाराचे गणित करण्याची वेळ आली आहे. पंकजा मुंडेंनी भाषणाच्या सुरुवातीला म्हटले की, बीड जिल्ह्यात मागच्या काही दिवसांमध्ये अतिवृष्टी झाली असून यामुळे लोकांचे मोठे नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यात सर्वत्र नुकसान झाले असून या गावाला त्या गावाला जाण्यापेक्षा थोडं अधिकाऱ्याला ताणते आणि तुम्हाला दुष्काळाची मदत मिळवून देते, असे आश्वासन त्यांनी दिले.

गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणींना उजाळा देत म्हणाल्या की, मुंडे साहेब आले की गडावर पाऊस पडायचा. आता काही तुम्ही आलात की पाऊस पडतो, असं लोक म्हणतात. असे म्हणून पंकजा मुंडे यांनी उपस्थितांना संबोधित केले यापुढे बोलताना म्हणल्या म्हणाल्या की, तुमच्या या कार्यक्रमाला खरोखरच शिवाचा आशीर्वाद आहे. माझे बाबा तर माझे बाबा आहेत पण भगवान बाबा नाही मी बाबा म्हणते, असे उद्गार त्यांनी काढले.

# वाघेश्वरी माता मंदिरात विधिवत घटस्थापना

बीड । प्रतिनिधी

**बीड तालुक्यातील कपिलधारवाडी गावातील ग्रामस्थांनी त्यांच्या ग्रामदैवत वाघेश्वरी माता मंदिरात विधिवत घटस्थापना केली. याप्रसंगी गावकऱ्यांच्या उपस्थितीत धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले.**



शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त, या कार्यक्रमाचा प्रारंभ तुळजापूरहून पायी ज्योत आणण्याच्या परंपरेच्या सोहळ्याने झाला. मागील दहा वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही गावकऱ्यांच्या भक्तिभाव आणि उत्साहाने साजरी झाली. ज्योत प्रवासादरम्यान, मार्गावर विविध गावकऱ्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि जयघोषात ज्योत दाखल होईपर्यंत सोहळ्याचा उत्साह वाढवत राहिला. वाघेश्वरी मित्र मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने संपूर्ण सोहळ्याचे आयोजन केले गेले. गावात काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून फुलांच्या उधळणीतून सोहळ्याला विशेष तेज आणले. कपिलधारवाडी येथील वाघेश्वरी माता मंदिरात ज्योत आगमनानंतर विधिवत पूजेसाठी नेण्यात आली. या प्रसंगी गावात धार्मिक आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले. नवरात्रोत्सवाच्या शुभारंभी गावकऱ्यांनी ऐक्य, भक्ती आणि परंपरेचे दर्शन घडवले. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ही ज्योत पायी आणणे म्हणजे फक्त श्रद्धेचा भाग नसून गावाच्या परंपरेशी निगडित अभिमानाचा विषय आहे. पुढील पिढ्यांनी ही परंपरा कायम ठेवावी, अशी वाघेश्वरी तरुण मित्र मंडळ सर्व ग्रामस्थांची इच्छा आहे. गट स्थापनेनंतर गावकऱ्यांनी एकत्र येऊन वाघेश्वरी मातेस वंदन केले आणि नवरात्रोत्सवाच्या सुरुवातीस संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण पसरले.

# सातव्या वेतनाची अंमलबजावणी करा

## सफाई कामगारांचे नगरपरिषदेसमोर उपोषण सुरू

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव नगरपरिषदेकडील सफाई कामगारांनी हक्काचे सातव्या वेतन आयोगानुसार वेतन तातडीने अंमलात आणावे या मागण्यांसाठी दिनांक २२ सप्टेंबर सोमवारपासून नगरपरिषद कार्यालयासमोर उपोषणास सुरुवात केली आहे. या आंदोलनामुळे नगरपरिषद प्रशासनावर मोठा दबाव निर्माण झाला आहे.



राज्य शासनाने सर्व नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा लाभ लागू केला आहे. मात्र माजलगाव नगरपरिषदेकडील काही कर्मचाऱ्यांना आजही तो मिळालेला नाही. याबाबत गेल्या अनेक महिन्यांपासून वारंवार पाठपुरावा करूनही नगरपरिषदेकडून ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे कामगारांमध्ये प्रचंड नाराजी असून अखेर त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

याबाबत संघटनेकडून वारंवार मागणी होऊनदेखील प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. या उपोषणामध्ये नगरपरिषद सफाई कामगार संघटनेचे पदाधिकारी तसेच सर्व कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. ''सातवा वेतन आयोग हा आमचा हक्क आहे. तो आम्हाला दिलाच पाहिजे अन्यथा आमचे उपोषण अधिक तीव्र केले जाईल,'' असा इशारा कामगारांनी दिला आहे.

कामगारांच्या मागण्या तातडीने मान्य न झाल्यास हे आंदोलन पुढे उग्र रूप धारण करेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. उपोषणामुळे नगरपरिषद प्रशासनासमोर निर्माण झालेली कोंडी दूर करण्यासाठी आता मुख्याधिकारी काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ओला दुष्काळ जाहीर करून तातडीची मदत द्यावी -अशोक रोमन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील खरीप २०२५ मधील झालेल्या अतिवृष्टीमुळे अभुतपूर्व नुकसानीमुळे ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीची मदत सरकारने द्यावी अशी मागणी अखिल भारतीय छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



बीड जिल्ह्यातील खरीप २०२५ हंगामात सप्टेंबर महिन्यात सतत झालेल्या अभुतपूर्व अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले आहे सरासरीच्या ५० टक्के पेक्षा अधिक पाऊस झालेला आहे या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची पिके पाण्यात बुडाली आहेत अनेक ठिकाणी जमिनी खरडून गेल्या आहेत आता तोंडाचा आलेला घास हिरावला गेला आहे काही ठिकाणी मानवी जीवित हानी जनावरांचा मृत्यू तसेच घराची पडझड झालेली आहे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे . अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने राज्य सरकारला मागणी करण्यात आली आहे सरसकट शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये आर्थिक नुकसान भरपाई एक लाख रुपये मदत देण्यात यावी नाही झाली तर अखिल भारतीय छावा संघटना आंदोलन करेल याची शासनाने नोंद घ्यावी तरी आपण याचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर शेतकऱ्यांच्या बँक खात्यात नुकसान भरपाई देऊन त्यांना आधार देण्याचे काम करावे. अशी मागणी करण्यात आली आहे.

# थोडक्यात...

## ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत करा : नवनाथ गवते

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात नव्हे महाराष्ट्रात गेल्या आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना न्याय द्यावा. सतत गेल्यात आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे या पावसाने शेतकरी अडचणी सापडला आहे. पावसाने शेतात आजही पाणी साचून शेतातील पीक पूर्णपणे कुजत आहे. नदीकाठावरील शेती तर पूर्णपणे खरडून गेली आहेत. शेतकर्यांच्या तोंडचा घास निघून गेला आहे, शेतकर्यांनी जगावं कसं, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. शेतकरी चिखलात लोळून टाहो फोडत आहे. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी नवनाथ गवते यांनी केली आहे. जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून परतीच्या पावसाने हजेरी लागली आहे. या झालेल्या मुसळधार पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे शेतकर्यांचे नुकसान झाले असून शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. यामुळे शेती नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, आणि ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी होत आहे. बीड जिल्हयात अनेक ठिकाणी सोयाबीन, कांदा, बाजरी, कपासी , उडीद,इतर तरकारी पिकांमध्ये पाणी साठल्याने ही पिके पाण्यात बुडालेली आहेत. त्यामुळे शेतकर्यांना लाखोंचा फटका बसला आहे. मुसळधार पावसामुळे भाजीपाल्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यात अधिक भर म्हणजे बाजारपेठेमध्ये दर कोसळल्याने शेतकर्यांना पावसाचा व दरांचा असा दुहेरी फटका बसत आहे. सोयाबीन पिकामध्ये पाणी साठल्याने सोयाबीन खराब होऊन कीड लागून खराब झाली आहे. परतीच्या पावसाने खरीप हंगामावर मोठे संकट ओढवले असून शेतकरी अक्षरशः उघड्यावर आले आहेत. दरम्यान प्रशासनाने या नुकसानीचा पंचनामा करून शेतकर्यांना तात्काळ दिलासा द्यावा अशी मागणी नवनाथ गवते यांनी केली आहे.



## पत्रकारांवर हल्ल्याचा जाहीर निषेध

पाटोदा । प्रतिनिधी

सप्टेंबर २०२५ रोजी वार्तांकनासाठी गेलेल्या पत्रकारांवर गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तींनी जीवघेणा हल्ला केला. झी २४ तासचे ब्युरो चीफ श्री. योगेश खरे, साम टीव्हीचे ब्युरो चीफ श्री. अभिजित सोनवणे व पुढारी न्यूजचे ब्युरो चीफ श्री. किरण ताजने यांच्यावर स्वामी समर्थ केंद्राजवळील पार्किंगवर दगडफेक, लाथाबुक्के यांचा वापर करून भयंकर मारहाण करण्यात आली.या गंभीर घटनेचा आझाद पत्रकार गणेश शेवाळे यांनी तीव्र निषेध केला आहे. ''महाराष्ट्र राज्यात गुन्हेगारी रोखता येत नसेल तर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी पदाचा राजीनामा द्यावा,'' अशी कठोर भूमिका त्यांनी मांडली.शेवाळे म्हणाले की, राज्यात पत्रकारांवर वारंवार होणारे हल्ले ही लोकशाहीला काळिमा फासणारी बाब असून चौथ्या स्तंभावर घाला घालणारी धोकादायक प्रवृत्ती आहे. पत्रकार सत्य घटनांचा आवाज बनून अन्याय, भ्रष्टाचार व सामाजिक प्रश्न प्रकाशात आणण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेतात. अशा लोकांवर होणारे हल्ले ही असह्य व निंदनीय बाब आहे.त्यामुळे शासनाने तात्काळ सर्व हल्लेखोरांना अटक करून कठोर कारवाई करावी, पत्रकारांच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना राबवाव्यात तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस व प्रभावी धोरण आखावे, अशी मागणी गणेश शेवाळे सतीश गर्जे यांनी केली आहे.

## शेषाबाई पांचाळ यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



तालुक्यातील कोथरूळ येथील शेषाबाई श्रीराम पांचाळ यांचे दि.२३ सप्टेंबर मंगळवार रोजी दुपारी ३:०० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ६० वर्ष होते. त्यांच्या पार्थिवावर दि.२३ सप्टेंबर मंगळवार रोजी सायंकाळी ६:०० वाजता कोथरूळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती एक मुलगा,एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.कोथरूळ येथील श्रीराम पांचाळ यांच्या त्या पत्नी होत.

## मिशन हॅपिनेस अंतर्गत नवनाथ गायकवाड यांचा सुसंवाद कार्यक्रम



बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य कृतिशील निवृत्त अधिकारी कर्मचारी संघटना जिल्हा शाखा बीड च्या वतीने बीड जिल्ह्यामध्ये राबवत असलेल्या '' मिशन हॅपिनेस''अंतर्गत जगप्रसिद्ध समूह तज्ञ नवनाथ गायकवाड यांचा चला दान घालून हा अंतर्मनाशी सुसंवाद साधून सर्व स्तरातील मानवाच्या जीवनातील ताणतणाव घालून सुखी आणि समृद्ध जीवन जगण्यासाठी प्रेरणा देणारा व तीन तास निखळ मनोरंजनातून मानवी जीवनातील अनेक समस्या वरती निखळ मनोरंजनातून उपाय करून आनंदी जीवनाचा मार्ग दाखवणारा कार्यक्रम दिनांक २१ सप्टेंबर रविवारी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात पार पडला. याप्रसंगी शिक्षक दिन, अभियंतादिन व मराठवाडा मुक्ती संग्राम दिन या पवित्र दिनाचे औचित्य साधून बीड आपली बहुमोल सेवा दिलेले आदरणीय इंजिनीयर एन. व्ही. बंडे यांची अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिव या पदावर पदोन्नती झाल्यामुळे व इंजिनीयर श्री सदगर यांची जीवन प्राधिकरण या विभागामध्ये कार्यकारी अभियंता पदावरती निवड झाल्यामुळे अभियंता दिनाचे औचित्य संघटनेच्या माध्यमातून भव्य सत्कार करण्यात आला. बीड शहराच्या वैभव मध्ये भर घालण्यासाठी आणि बीड शहरातील नागरिकांचे जीवन आनंदी करण्यासाठीआपापल्या परीने सामाजिक बांधिलकीचे जाण आणि भान ठेवून कार्यरत असणाऱ्या जाणीव ग्रुप चे अध्यक्ष अँड. विवेकानंदजी सानप व ज्ञानयोग ग्रुपचे इंजिनिअर वाघ यांचा देखील भव्य सत्कार करण्यात आला. माननीय शैलेश फडसे मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषवले होते, प्रमुख पाहुणे म्हणून एन व्ही बंडे अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ धाराशिव, तोंडे कार्यकारी अभियंता सांबा विभाग बीड, डॉ. राजेंद्र भोरे,ऍड. विवेकानंद सानप व इंजिनीयर वाघ हे कार्यक्रमास उपस्थित होते.

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-९३७ दिनांक-१९/०९/२०२५

## जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सायमा अशपाक तांबोळी रा.जामखेड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सायमा अशपाक तांबोळी | स्वत: | १५/०७/१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १९/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

cmyk

# शक्तिपीठ करण्यापेक्षा ८० हजार कोटींची सरसकट कर्जमाफी द्या; सुप्रिया सुळेंची मागणी

कोल्हापूर : शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. काळ्या मातीशी इमान राखणारा आणि तुमच्या आणि माझ्या अन्नधान्याचा प्रश्न सोडवणारा शेतकरी आज अडचणीत आहे. त्याला तातडीने सरसकट कर्जमाफी द्यावी आणि ओला दुष्काळ जाहीर करावा. सरकारने याबाबत काही पाऊल उचलले नाही तर आम्हाला रस्त्यावर उतरल्याशिवाय दुसरा मार्ग नाही, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिला आहे. त्या मंगळवारी (दि. २३ सप्टेंबर) कोल्हापुरात पत्रकाराशी बोलत होत्या.

सरकारने ८० हजार कोटींचा शक्तिपीठ करण्यापेक्षा ८० हजार कोटी देऊन तातडीने शेतकऱ्यांना सरसकट कजर्माफी द्यावी. ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकरी कर्तुत्वाने स्वतः कसा उभा राहील? यासाठी प्रयत्न केले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली आहे. मे मध्ये पाऊस सुरु झाला. जून- जुलैमध्ये अधिवेशन सत्र झाले. त्यावेळी महाराष्ट्र सरकारने ओला दुष्काळ जाहीर करायला हवा होता. सरसकट कर्जमाफी द्यायला हवी होती. अशी परिस्थिती असताना महाराष्ट्र सरकारने काही केले नाही. देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे दोन जबाबदाऱ्या आहेत. ते गृहमंत्री



आहेतच. त्यासोबतच ते सहकारी मंत्री आहेत. राष्ट्रवादीच्या आठही खासदारांनी त्यांची भेट घेतली होती. ही जुलै महिन्याची गोष्ट आहे. आम्ही त्यांच्याकडे विनंती केली होती की महाराष्ट्राच्या सरकारला सांगावे, ओला दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी. ही मागणी राष्ट्रवादी सातत्याने दोन महिने केंद्र आणि महाराष्ट्र सरकारकडे करत आहे. पण सरकार असंवेदनशील आहे, अशी टीका त्यांनी केली. सरकार एक वर्षापूर्वी कोल्हापूरमध्ये सांगत होते. आम्हाला सत्ता द्या, आम्ही सरसकट कर्जमाफी करु. हा शब्द त्यांनी ऑक्टोबरआधी दिला होता. पण पुढचा ऑक्टोबर आला तरी काही नाही. शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. त्याला सरसकट कर्जमाफी आणि ओला दुष्काळ जाहीर करणे, यासाठी सरकारने खूप उशीर केला असल्याचे सुळे म्हणाल्या.सरकारला शक्तिपीठ महामार्ग सारखे मोठे पायाभूत प्रकल्प हवे आहेत. यासाठी फाईल लगेच हालते. निधीही असतो. पण छोटे रस्ते, कामे गरजेची असतात. त्याकडे सरकारचे लक्ष नाही. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे पैसे मिळतात का?. लाडकी बहीणचे योजनेमधील नावे कमी होत आहेत. पुण्यात क्राईम, पायाभूत सुविधा कोलमडली आहे. हिंजवडीचा प्रश्न तुम्ही पाहिला आहेच, असे सांगत त्यांनी राज्यातील अनेक प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला. सरकारच्या विरोधात गेले तर आयकर, ईडीची नोटीस येते. ते शक्य नाही झाले तर नवीन ट्रेंड आहे, फोन करणे, धमक्या देणे. मला यात काही आश्चर्य वाटत नाही. महाराष्ट्राच्या पोलिसांचा मला सार्थ अभिमान आहे. पण पोलिसांवर त्यांची भीतीच सरकारमध्ये राहिली नाही. गुंडांना सुरक्षा दिली जाते. १२ वर्षे जेलमध्ये असणाऱ्यांना सुक्षा पुरवली जाते, हे महाराष्ट्राला शोभणारे नाही. हे दुर्दैव आहे, अशा शब्दांत त्यांनी सरकारवर हल्लाबोल केला.

## कारले लागवड : प्रमुख वाण आणि उत्पादन



पारंपरिक पिकांमधुन शेतकऱ्यांना खर्च वजा जाता जास्त काही मागे उरत नाही. काही वेळा तर पिकांवर रोग पडल्यास किंवा पारंपारिक पिकांचा कालावधी जास्त असल्याने, अतिवृष्टी झाल्यास शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नाही. परिणामी, आता शेतकऱ्यांनी आधुनिक होण्याची गरज निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर शेतकरी कारले या भाजीपाला पिकाच्या लागवडीतून चांगली कमाई करू करतात.

हायब्रीड कारले लागवड : हायब्रीड कारल्याच्या सदाहरित वाणांच्या लागवडीसाठी हवामानाचे कोणतेही बंधन नसल्याने अनेक शेतकरी संकरित कारली वेगवेगळ्या भागात पिकवून चांगला आर्थिक नफा मिळवत आहेत. हायब्रीड कारल्याच्या फळाची लांबी १२ ते १३ सेमी आणि वजन ८० ते ९० ग्रॅम पर्यंत असते. एक एकर शेतात हायब्रीड कारले पिकवल्याने ७२ ते ७६ क्विंटल उत्पादन मिळते, जे सामान्यपेक्षा खूप जास्त आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना अधिक आर्थिक उत्पन्न मिळवण्यास मदत होते.

'या' आहेत प्रमुख जाती : विशेषतः प्रिया आणि कोईम्बतूर लवंग या संकरित कारल्याच्या जाती उत्पादनाच्या बाबतीत अव्वल आहेत. याशिवाय पुसा ते मोसमी, पुसा स्पेशल, कल्याणपूर, कोईम्बतूर लांब, कल्याणपूर सोना, बारमाही कारला, प्रिया सीओ-१, एसडीयू-१, पंजाब कडू-१, पंजाब-१४, सोलन हारा, सोलन आणि बरहामास इ. कारल्याच्या सर्वोत्तम जाती देखील शेतकऱ्यांना लागवडीसाठी उपयुक्त आहेत.

किती लागते हेक्टरी बियाणे?: उत्तम निचरा होणारी वालुकामय चिकणमाती माती संकरित कारल्याच्या लागवडीसाठी उत्तम आहे. कडू वेल मध्यम उष्ण तापमानात फुलतात. एक हेक्टर क्षेत्रामध्ये कारल्याच्या लागवडीसाठी १.८ ग्रॅम बियाणे आवश्यक आहे, ज्याची लागवड रोपवाटिकेत बीजप्रक्रिया केल्यानंतरच करावी. रोपवाटिकेमध्ये रोपे तयार केल्यानंतर शेत सेंद्रिय पद्धतीने तयार करून कडबा रोपांची ओळीत लागवड करावी. वेल व्यवस्थित पसरवण्यासाठी शेतकरी स्टेजिंग बनवतात, ज्यामुळे उत्पादन आणि उत्पादकता दोन्ही वाढते.

## जिरॅनियम शेती शेतकऱ्यांसाठी दुहेरी फायदा; वाचा लागवडीचे तंत्रज्ञान!

जिरॅनियम ही एक सुगंधी व औषधी वनस्पती आहे. या वनस्पतीला प्रक्रिया उद्योगासाठी चांगली मागणी आहे. जिरॅनियम पाल्यापासून तेल काढतात. तेलात जिरॅनियम आणि सिट्रोनेलॉल आहे. याचा वापर उपचार पद्धतीमध्ये होतो. जिरॅनियम तेलाचा उपयोग सुगंधी साबण, अगरबत्ती, अत्तर निर्मितीसाठी होतो. तर कापणीनंतर उरलेल्या पालापाचोळ्यापासून खत निर्मिती होते. बाजारपेठेची मागणी लक्षात घेऊन सामुहिक पद्धतीने याची लागवड करणे शक्य आहे. जिरॅनियमची एकदा लागवड केल्यास किमान तीन वर्षापर्यंत चांगल्या प्रकारे उत्पादन मिळते. या पिकाचा व्यवस्थापन खर्च इतर पिकांपेक्षा कमी आहे.

प्रमुख प्रजाती कोणत्या?

जिरॅनियम लागवडीसाठी मध्यम प्रतीची पाण्याचा चांगल्या प्रकारचा निचरा होणारी सुपीक जमीन निवडावी. हलक्या ते मध्यम जमिनीतही लागवड शक्य आहे. सुरवातीला नांगरणी केल्यानंतर दोनदा कुळवाच्या पाळ्या देऊन, जमीन भुसभुशीत करावी. त्यानंतर गादी वाफे बनवून लागवड करावी. अलजीरियन, ट्युनिशिया, रीयूनियन, बोर्बन, हेमंती, बिपुली, कुंती, आय.आय.एच.आर. ८, उटी, नर्मदा, इजिप्शियन आणि सिम-पवन इत्यादी जाती महत्वाच्या आहेत.

असे आहे लागवड तंत्रज्ञान : रोपे तयार करण्यासाठी एप्रिल-मे आणि सप्टेंबर-ऑक्टोबरचा कालावधी योग्य आहे. लागवडीसाठी रोपे ४५ ते ६०



दिवसांची असावीत. रोपांची काडी जेवढी जाड तेवढी ती रोपे चांगली असतात. रोपांची तंतुमय मुळे चांगल्याप्रकारे वाढलेली असावीत. या रोपांची लागवड प्रामुख्याने ६०६० सेंमी किंवा ७५६० सेंमी इतक्या अंतरावर करावी. चांगल्या प्रकारे कुजलेले शेणखत लागवडीपूर्वी १५ दिवस अगोदर द्यावे. प्रति हेक्टरी २०० किलो नत्र, ३५ किलो स्फुरद आणि ३५ किलो पालाश द्यावे. लागवडीच्या वेळी २० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश आणि उर्वरित ८० टक्के नत्र लागवडीनंतर ३०, ४५, ६० आणि ७५ दिवसांनी समान हप्त्यात विभागून द्यावे. १५ ते २० दिवसांच्या अंतराने दोन खुरपण्या करून शेत तणविरहित ठेवावे. लागवड केल्यानंतर साधारणपणे १ ते १.५ महिन्यानंतर रोपांना भर द्यावी.

एवढे मिळू शकते उत्पादन : रब्बी हंगामात साधारणपणे ७ ते ८ दिवसांनी आणि उन्हाळी हंगामात ५ ते ६ दिवसांनी पाणी द्यावे. खरीप हंगामात पावसाच्या अंदाजानुसार पाणी द्यावे. पानांचा थोडासा रंग हा फिक्कट पिवळसर होण्यास सुरवात झाल्यावर तसेच सुगंध हा गुलाबासारखा येण्यास सुरवात झाल्यावर कापणी करावी. लागवड केल्यानंतर दर चार महिन्यांनी विळ्याच्या साह्याने कापणी करावी लागते. कापणी केल्यानंतर पुन्हा लागवड करण्याची आवश्यकता नसते. हेच पीक तीन वर्षापर्यंत चालते. कधीकधी, ०.१% उत्पन्न मिळू शकते. तीनही कापणीतून प्रति हेक्टर ताज्या वनौषधीचे उत्पादन सुमारे ३० टन आहे. जे उर्ध्वपातनावर सुमारे २४ किलो तेल मिळते. मैदानी प्रदेशात मात्र, सुमारे ४० टन औषधी वनस्पती/हेक्टर/वर्ष उत्पादन मिळते ज्यातून ४० किलो तेल तयार होते.

## उत्पादनवाढ मिळविण्यासाठी रब्बी ज्वारी लागवड तंत्रज्ञान

अन्नधान्य व चारा देणारे ज्वारी हे उष्ण व कटिबंधीय प्रदेशातील महत्त्वाचे पीक आहे. रीखालील क्षेत्र व उत्पादनात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. कमीत कमी निविष्ठांमध्ये विविध हंगाम व भौगोलिक परिस्थितीत घेता येणारे हमखास पीक आहे. पावसाची अनियमितता, बदलते हवामान, वाढत्या लोकसंख्येला अन्न, जनावरांना चारा, इंधन निर्मितीची क्षमता यामुळे ज्वारी हे बहुउपयोगी शाश्वत पीक ठरते.

उेत्पादन वाढविण्यासाठी उपाययोजना : योग्य जमिनीची निवड ओलिताखालील क्षेत्र वाढविणे. सुधारित जातीचा वापर. बीज प्रक्रियेचा अवलंब व खताचा योग्य वापर. दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी ठेवण्यासोबत हेक्टरी बियाण्याचे योग्य प्रमाण ठेवणे. वेळेवर आंतर मशागत व पीक संरक्षणाचे उपाय करणे. पक्ष्यापासून पिकांच्या संरक्षणासाठी उपाययोजना करणे. उदा. चमकणाऱ्या पट्ट्यांचा वापर करणे.

जमिनीची निवड : मध्यम ते भारी पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी. हलकी जमीन शक्यतो टाळावी. अशा जमिनीत पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी असल्याने पिकाच्या संवेदनशील काळात पाणी कमी पडू शकते.

मशागत आणि ओलावा साठवण : पेरणीपूर्वी १५ दिवस अगोदर मूग, उडीद काढणी केलेल्या शेतामध्ये ४५ सेंमी अंतरावर बळिराम नांगराने सऱ्या करून ठेवाव्यात. जमिनीत लहान सरी वरंबे किंवा



समपातळी वाफे तयार करावेत. त्यामुळे सप्टेंबरच्या दुसऱ्या व तिसऱ्या आठवड्यातील पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होईल. या सरीमध्ये शिफारस केलेल्या खताची पेरणी करावी. पेरणीच्या योग्य वेळी सरीमध्ये ज्वारी खोलवर पेरावी. त्यानंतर रासणी करू नये. अशा प्रयोगांमुळे दाण्याचे उत्पादन २० ते २५ टक्के अधिक मिळते. कडब्याची प्रतही उत्तम मिळते.

पेरणीचा कालावधी : कोरडवाहू पेरणी - १ ते १५ ऑक्टोबर. बागायती पेरणी - १ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर. या पेक्षा लवकर पेरणी केल्यास खोडमाशीचा उपद्रव वाढतो. उशिरा पेरणी केल्यास ओलावा कमी पडून बियाणांची उगवण कमी होते.

बियाणे : हेक्टरी १० किलो प्रमाणित बियाणांची शिफारस आहे.

पेरणीचे अंतर : दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी व दोन ताटातील अंतर १५ सेंमी ठेवावे.

तण नाशकांचा वापर : अॅट्राझीन (५० टक्के प्रवाही) १ किलो प्रती एक हजार लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी जमिनीवर पेरणीनंतर परंतु पीक उगवण्यापूर्वी फवारावे.

बीजप्रक्रीया : काणी रोग प्रतिबंधासाठी ३०० मेश गंधक ४ ग्रॅम प्रति किलो.

खोडमाशीचे व्यवस्थापन : थायामिथॉक्झाम (७० टक्के) ३ ग्रॅम प्रति किलो किंवा इमिडाक्लोप्रीड (४८ टक्के एफएस) १४ मि. लि. प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. खोडमाशीमुळे होणारी पोंगे मर कमी होऊन आर्थिकदृष्ट्या फायदा वाढतो. त्यानंतर जिवाणू संवर्धनाची बीजप्रक्रिया : अॅझोटोबॅक्टर व पीएसबी या जिवाणू संवर्धनाची प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणे प्रक्रिया करावी.

आंतरमशागत :द पेरणी केल्यामुळे कोळपणी सुलभ होते. आंतर मशागत केल्यामुळे काळ्या जमिनीला पडणाऱ्या भेगा मातीने बुजतात. त्यामुळे बाष्पीभवन कमी होते. पिकामध्ये सेंद्रीय पदार्थाचे (उदा. मुग/उडीद/सोयाबीन) आच्छादन केल्यास उत्पादनात वाढ होते. पहिली कोळपणी ही पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी. दुसरी कोळपणी ही पेरणी नंतर २५ ते ३० दिवसांनी. तिसरी कोळपणी ही पेरणी नंतर ४० ते ५० दिवसांनी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६४१ : साली सहा हजार करोड पेक्षा जास्त सोन्या चांदीने भरलेला रॉयल मर्चंट जहाज इंग्लंडच्या दक्षिणी पश्चिमी समुद्री भागात बुडाला.
१८०३ : दुसरे इंग्रज-मराठा युद्ध: ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी आणि भारतातील मराठा साम्राज्य यांच्यातील अश्तेची लढाई.
१८४६ : अर्बेन ली व्हेरिअर व त्याच्या २ सहकार्यांनी नेपच्यून ग्रहाचा शोध लावला. गणिती आकडेमोड करुन शोध लागलेला हा पहिला ग्रह आहे.
१८७३ : महात्मा ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.
१८८४ : महात्मा फुलेंचे सहकारी रावबहादूर नारायण लोखंडे यांनी बाँबे मिल हँड्स असोसिएशन ही गिरणी कामगार संघटना स्थापन केली.
१८८९ : साली विडियो गेम बनविणारी अमेरिकन विश्व प्रसिद्ध कंपनी निनट्याडो ची स्थापना करण्यात आली.
१९०५ : आधी एकत्र असलेल्या नॉर्वे व स्वीडन यांनी 'कार्लस्टॅड' कराराद्वारे अलग होण्याचा निर्णय घेतला.
१९०८ : कॅनडातील 'युनिव्हर्सिटी ऑफ अल्बर्टा' ची स्थापना
१९३२ : हेझाझ आणि नेजडचे राज्य यांना सौदी अरेबियाचे राज्य नाव देण्यात आले.
१९८३ : 'सेंट किट्स आणि नेव्हिस'चा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९२ : भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस इंद्रजित गुप्ता ''उत्कृष्ट संसदपटू'साठीचा ''गोविंद वल्लभ पंत पुरस्कार' पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांच्या हस्ते प्रदान.
२००२ : 'मोझिला फायरफॉक्स' या ब्राउजरची पहिली आवृत्ती प्रकाशित करण्यात आली.
२००३ : भारतीय वंशाच्या मीरा नायर यांची आशिया अमेरिकी साहित्य पुरस्कारासाठी निवड. त्यांच्या ''व्हीडिओ : स्टोरीज' या पुस्तकात स्थलांतराबाबतच्या अनुभवांचे कथन करण्यात आले आहे.
२००४ : योकोहामा (जपान) येथील मैदानी स्पर्धेत भारताच्या अंजू जॉर्जने रशियाची ऑलिंपिक विजेती तात्याना लेबेदेवाचा पराभव करून सुवर्णपदक पटकावले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२१५ : कुबलाई खान मंगोल सम्राट (मृत्यू: १८ फेब्रुवारी १२९४)
१७७१ : जपानी सम्राट कोकाकु यांचा जन्म.
१८६१ : रॉबर्ट बॉश जर्मन अभियंते आणि उद्योजक (मृत्यू: १२ मार्च १९४२)
१९०३ : युसूफ मेहेर अली समाजवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक व मुंबईचे महापौर (मृत्यू: २ जुलै १९५०)
१९०८ : रामधारी सिंह 'दिनकर' देशभक्त व हिन्दी साहित्यिक (मृत्यू: २४ एप्रिल १९७४). भागलपूर विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. केंद्रीय गृहमंत्रालयाचे ते हिंदी भाषाविषयक सल्लागार होते.
१९११ : भारतीय भौतिकशास्त्रज्ञ राप्पल संगमेश्वर कृष्णन यांचा जन्म. त्यांचे प्रमुख संशोधन प्रकाशाचे विखुरणे, वर्णपट विज्ञान, स्फटिकभौतिकी व अणुकेंद्रीय भौतिकी या शाखांतील आहे. त्यांनी एका नवीन प्रकाशकीय परिणामाचा शोध लावला व सैद्धांतिकरीत्या त्याचे व्यापक स्वरूप प्रस्थापित केले. या परिणामाला ''कृष्णन परिणाम' असे नाव प्राप्त झाले आहे.
१९१४ : ब्रुनेईचा राजा ओमर अली सैफुद्दीन (तिसरा) यांचा जन्म.
१९१५ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ क्लिफर्डशुल यांचा जन्म.
१९१७ : साली भारतीय सेंद्रिय रसायनशास्त्री असीमा चटर्जी यांचा जन्मदिन.
१९१९ : देवदत्त दाभोळकर पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, शिक्षणतज्ज्ञ, गांधीवादी व समाजवादी (मृत्यू: १७ डिसेंबर २०१०). त्यांची ''अ पायलट सर्व्हे ऑफ शिरुर तालुका ॲग्रो इंडस्ट्रिअल बॅलन्स', ''क्लाइंबिंग अ वॉल ऑफ ग्लास', ''सरदार सरोवर डिबेट', ''ओ नर्मदा' इ. अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहेत.
१९२० : प्रा. भालचंद्र वामन तथा 'भालबा' केळकर नाट्यकला, विज्ञान, अध्यात्म या सर्व क्षेत्रंत सारख्याच अधिकाराने वावरणारे सव्यसाची व्यक्तिमत्त्व, प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष, हौशी प्रायोगिक रंगभूमीचे अध्वर्यू, लेखक, अभिनेते, दिग्दर्शक (मृत्यू: ६ नोव्हेंबर १९८७).
१९३५ : साली प्रसिद्ध भारतीय हिंदी आणि पंजाबी चित्रपट अभिनेता प्रेम चोपडा यांचा जन्मदिन.
१९४३ : तनुजा चित्रपट अभिनेत्री
१९५० : गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रात उल्लेखनीय वैद्यकीय सेवाकार्य करणारे डॉ. अभय बंग यांचा जन्म. त्यांना ''महाराष्ट्र भूषण' पुरस्काराने गौरविण्यात आले.
१९५२ : अंशुमान गायकवाड क्रिकेटपटू
१९५७ : कूमार सानू पार्श्वगायक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : ग्रँट डफ मराठ्यांचा इतिहास लिहीणारा ब्रिटिश अधिकारी (जन्म: ८ जुलै १७८९)
१८६३ : साली ब्रिटीश कालीन भारतातील पहिल्या स्वातंत्र्य संग्रामाच्या वेळी हरियाणा येथील बंडाचे नेतृत्व करणारे महान क्रांतिकारक राव तुलाराम सिंह यांचे निधन.
१८७० : प्रॉस्पर मेरिमी फ्रेंच कथालेखक, नाटककार, इतिहासकार आणि पुरातत्त्वज्ञ (जन्म: २८ सप्टेंबर १८०३)
१८८२ : फ्रेडरिक वोहलर जर्मन रसायनशास्त्रज्ञ (जन्म: ३१ जुलै १८००)
१९३९ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (जन्म: ६ मे १८५६)
१९६४ : भार्गवराम विठ्ठल तथा 'मामा' वरेरकर (जन्म: २७ एप्रिल १८८३). सत्तेचे गुलाम, करीन ती पूर्व, हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार आदी नाटके त्यांनी लिहिली. रवींद्रनाथ टागोर, शरच्चंद्र चट्टोपाध्याय, जेम्स बॅरी, हेन्रिक इब्सेन, विल्यम बॅरेट यांच्या साहित्यकृतींचे मराठी अनुवाद त्यांनी केले. विधवाकुमारी, संसार की संन्यास, धावता धोटा या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांना सरकारने ''पद्मविभूषण' सन्मान प्रदान केला होता.
१९९९ : मराठी चित्रपट, जाहिरातपट निर्माते गिरीश घाणेकर यांचे निधन.
२००४ : डॉ. राजा रामण्णा शास्त्रज्ञ, अणुऊर्जा आयोगाचे ४ थे अध्यक्ष (जन्म: २८ जानेवारी १९२५)
२०१२ : कांतिलाल गिरीधारीलाल व्होरा ऊर्फ के. लाल जादूगार (जन्म:१९२४)
२०१५ : भारतीय संन्यासी आणि तत्त्वज्ञ दयानंद सरस्वती यांचे निधन. (जन्म: १५ ऑगस्ट १९३०)

# प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांची प्रदर्शनी ज्ञानाचा भंडार - हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

व्यापारी महासंघ जिल्हा जालनाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा हरिओम नगर, गांधी चमन, जुना जालना येथील प्राध्यापक श्रीकांत चिंचखेडकर यांचा नारायणी फाऊंडेशन तर्फे साकारलेली गणीताची प्रयोगशाळा नामगिरी देवीचा भव्य देखावा प्रदर्शनीला दि. २१ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी भेट देण्यात आली. त्या प्रसंगी बैठकीत जिल्हाध्यक्ष हस्तीमल बंब म्हणाले, समाजात विशेष करून शालेय विद्यार्थी, युवकाला चांगला संदेश देण्याचे काम चिंचखेडकर करत असतात. विविध उपक्रमातून अनेक वर्षापासून कोणती अपेक्षा न ठेवता निःस्वार्थ भावनाने अविरत काम करत आहे.

हस्तीमल बंब पुढे म्हणाले, ही भव्य प्रदर्शनी सर्वांसाठी मोफत आहे, हे सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. देशात आदर्श नागरिक युवक घडविण्यासाठी ही प्रदर्शनी प्रेरणा देणारी आहे. या अभियानाला आमचे पुर्ण सहकार्य राहील. प्रा. श्रीकांत चिंचखेडकर



आपल्या क्लासेसमुळे गोर-गरीब गरजु विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण सुध्दा देत आहेत. त्यांची ही प्रदर्शनी ज्ञानाचा भंडार व ज्ञानाचा वाटप आहे, असे बंब म्हणाले. उपाध्यक्ष सुखदेव बजाज म्हणाले, फारच सुंदर प्रदर्शनी पाहण्याचा योग आला. चिंचखेडकर यांची कल्पना फारच खोल आहे. आजच्या युगात आपण कल्पनाही करु शकत नाही. खरोखरच प्रशंसनीय आहे. हा महान कार्याबद्दल बोलणे म्हणजे सुर्याला दीपक दाखवण्यासारखे आहे, असे बजाज म्हणाले. या अभियानाची माहिती देताना चिंचखेडकर म्हणाले, या प्रदर्शनात महान गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन, आर्किमिडीज, महावीराचार्य, नेपियर स्वामी भारती कृष्ण तीर्थ, पायथागोरस, भास्कराचार्य (द्वितीय), अपोलोनियस, कार्ल गॉस, न्यूक्लिड, श्रीधराचार्य, बोधायन, प्रशांत चंद्र, महालनोबिस यांच्यासारख्या महान देश विदेशातील गणित तज्ञांचे कार्य व भव्य मूर्ती तयार केल्या आहेत. या उपक्रमा अंतर्गत मुलभुत संकल्पना आणि समीकरणे अत्यंत सोप्या भाषेत व गमतीशीरपणे प्रत्यक्ष स्वरुपात दाखवले आहे. जवळपास १०० प्रयोगाची संख्या असून, या मागील मुख्य उद्देश्य युवकांना, मुलांना गणिताबद्दल रुची वाढविणे, महान गणिततज्ञांच्या कार्याचा गौरव, त्यांच्या कार्याची माहिती जन-माणसापर्यंत पोहचविणे आहे. आता पर्यंत हजारो शालेय विद्यार्थी, युवक व जन-माणसाने या प्रदर्शनीचा मोफत लाभ घेतलेला आहे. अशी प्रदर्शनीची सखोल माहिती चिंचखेडकर यांनी दिली. चर्चात उपाध्यक्ष अंकुश राऊत, सचिव प्रविण मोहता, प्रमोद जोशी, मकरंद शहापुरकर यांनी भाग घेतला. प्रदर्शनी दाखविण्यात जयश्री चिंचखेडकर, सौ. चिंचखेडकर यांनी परिश्रम घेतले.

## अतिवृष्टी बाधीत गावाची जिल्हाधिकारी यांनी केली पाहणी

### पाण्यात अडकलेल्या १४ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविले



जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात आठ दिवसापासून तसेच २२ सप्टेंबर रोजी मध्यरात्री जोरदार अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे विरेगाव येथील १४ नागरिक पुरात अडकले असता जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर आणि जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी प्रत्यक्ष ठिकाणी भेट देऊन अग्निशमन दलाच्या जवानांच्या सहाय्याने पुरात अडकलेल्या १४ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविले.

जालना तालूक्यातील सेवली मंडळात काल रात्री सुमारे ६५ मि.मी. पाऊस पडला. यामुळे सेवली मंडळातील उखळी येथील पाझर तलाव अतिवृष्टीने फुटल्याने याठिकाणच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्याअनुषंगाने आमदार अर्जुनराव खोतकर आणि जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी जालना तालूक्यातील विरेगाव, सेवली व नेर मंडळाचा दौरा करुन अतिवृष्टीने झालेल्या नुकसानग्रस्त भागांची पाहणी करुन, संबधीतांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश दिले. तसेच नागरिकांशी संवाद साधुन शासन प्रशासन आपणांस सर्वोतोपरी सहकार्य करेल असे आश्वासन दिले.यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर, जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, उपविभागीय अधिकारी जालना रामदास दौंड, तहसीलदार जालना श्रीमती छाया पवार आदींची उपस्थिती होती.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये प्लॉटिंग व्यावसायिकावर तिघांकडून गोळीबार

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

प्लॉटिंग व्यावसायिकावर तिघांनी गोळीबार केल्याची घटना २२ सप्टेंबरच्या मध्यरात्री बारादरम्यान एपीआय कॉर्नर ते कलाग्राम रस्त्यावर घडली. घटनेत व्यावसायिक तौफिक शफिक पठाण (३०, रा. कमळापूर, वाळूज एमआयडीसी) बालंबाल बचावले.

या प्रकरणी एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तौफिक शफिक पठाण प्लॉटिंगचा व्यवसाय करतात. मित्र निसार जबार खान (रा. मिसारवाडी) यांच्यासह तौफिक चिकलठाण्यातील हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले होते. तिथून निघताना फिर्यादीच्या (एमएच २० एफसी ७०००) कारसमोर गणेश औताडे दारू पिऊन लघुशंका करत असल्याने त्यांच्यात वाद झाला. दरम्यान, गणेशसोबतच्या मित्रांनी हा वाद सोडविला.

त्यानंतर फिर्यादी निघाले. निसारची (एमएच २० डीजी ०४५०) कार पुढे आणि फिर्यादी तौफिक यांची कार मागे होती. दोघेही कलाग्राममार्गे प्रोझोनच्या दिशेने कमळापूरला जात असताना निसार यांनी रत्नप्रभा मोटर्सजवळ कार थांबविली. फिर्यादी कारमध्येच होते. को-ड्रायव्हरची काच उघडी ठेवून ते निसार यांच्याशी बोलत होते. त्याचवेळी अचानक एपीआय कॉर्नरकडून स्कुटीवर तिघे आले. त्यातील पाठीमागे बसलेला स्कुटी थांबवून कारजवळ आला. यावेळी लघुशंकेसाठी उतरलेल्या निसार यांनी त्याला पाहताच फिर्यादीला 'गाडी निकाल' असा जोरात आवाज देत ते स्वतःची कार सोडून फिर्यादीच्या कारमध्ये बसून निघाले.त्याचवेळी एकाने गोळी झाडली, हे पाहताच निसार आणि तौफिक मागे सरकले. गोळी त्यांच्या कानाजवळून गेली आणि बंद काचेवर लागली. आरोपींनी निसार यांच्या कारच्या काचाही फोडल्या. दोघेही फिर्यादी एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गेले असता हद्द एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्याची असल्याने त्यांना तेथे जाण्यास सांगितले. दरम्यान, गस्तीवरील वरिष्ठ पोलिस निरीक्षक शिवाजी बुधवंत यांनी त्यांना एमआयडीसी सिडको ठाण्यात बोलविल्यानंतर दोघेही गेले. दरम्यान, तिघांविरोधात पहाटे तीनला गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सहायक पोलिस निरीक्षक भरत पाचोळे करत आहेत.

## लंपीचा प्रादुर्भाव वाढला : पुर्णा तालुक्या बैल दगावला; शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण

पूर्णा । प्रतिनिधी

तालुक्यातील पांगरा लासीना येथील शेतकरी संदीप माधव ढोणे यांच्या गोठ्यातील एक मोठा बैल लंपी स्किन डिसीजने बाधित होऊन उपचार करूनही दगावला. २२ सप्टेंबर रोजी झालेल्या या घटनेमुळे ढोणे यांचे सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाले असून ते आर्थिक संकटात सापडले आहेत.

मागील काही दिवसांपासून पांगरा व तरंगल परिसरातील पशुधनाला लंपी स्किन डिसीजचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. शरीरावर गाठी येणे, ताप चढणे अशी या आजाराची लक्षणे असून, अनेक शेतकरी महागडे उपचार करूनही जनावरे वाचवण्यात अपयशी ठरत आहेत. तब्बल १५ दिवस सतत उपचार करूनही आजार आटोक्यात येत नाही, परिणामी जनावरांचा मृत्यू होत आहे. गेल्या काही दिवसात गौर, पांगरा आदी गावांतील अनेक जनावरे लंपीमुळे दगावली आहेत. शासकीय पशुवैद्यकीय सेवेतील दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांना खासगी डॉक्टरांकडून उपचार घ्यावे लागत असून त्यामुळे मोठा आर्थिक बोजा वाढला आहे. आधीच अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेले असताना लंपीचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. ढोणे यांनी बाधित बैलावर १५ दिवसांहून अधिक काळ उपचार करून घेतले. यासाठी सुमारे १५ हजार रुपये खर्च झाला. तरीही बैलाचा मृत्यू झाल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना लंपी बाधित जनावरांसाठी शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## कालिका स्टीलला ग्रीन स्टार मानांकन पाच स्तरिय प्रमाणपत्राने गौरव




जालना। प्रतिनिधी

पॅरिस करार २०१५ नुसार भारतासह सर्व देशांनी आपला कार्बन फूटप्रिंट कमी करण्याचे वचन दिले होते. या अनुषंगाने भारताच्या स्टील मंत्रालयाने २०२४ मध्ये ग्रीन स्टील टॅक्सोनॉमी जाहीर केली.


या अंतर्गत कार्बन उत्सर्जनाच्या प्रमाणानुसार प्रत्येक उत्पादकाला ३ स्टार, ४ स्टार व ५ स्टार अशा श्रेणीत वर्गीकृत केले जाते. जालना येथील कालिका स्टील्स या मानांकनासाठी अर्ज केले होते. अलीकडेच झालेल्या आयआयएफच्या वार्षिक कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रिय मंत्री प्रल्हाद जोशी व महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत कालिका स्टीलला ५ स्तर प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, जालना शहरासाठी अभिमानाचा क्षण असल्याची प्रतिक्रिया कालिका स्टीलचे संचालक तथा गोरक्षक पांजरापोल संस्था अध्यक्ष श्री. घनशामदास गोयल यांनी व्यक्त केली आहे.

## कळमनुरी तालुक्यातील ढगफुटी सदृष्य पावसाने शेतकऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान

हिंगोली। प्रतिनिधी

कळमनुरी तालुक्यातील सिंदगी परिसरात झालेल्या विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तब्बल अर्धा ते एक तास ढगफुटी सदृष्य पाऊस झाल्याने झेंडू, सोयाबीन या नगदी पिकांसह कापूस व हळद पिकांवरही मोठा परिणाम झाला.

सिंदगी व परिसरातील बोल्डा, जांब, येहळेगाव गवळी, कोंढुर, डिग्रस व गोर्लेगाव या गावांमध्ये शेतकरी अनेक वर्षांपासून झेंडूचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतात. दिवाळीच्या काळात बाजारपेठेत झेंडूला प्रचंड मागणी असते. त्यामुळे हे पीक शेतकऱ्यांसाठी 'नगदी पीक' मानले जाते. झेंडूच्या विक्रीतून मिळणारे उत्पन्न शेतकऱ्यांची दिवाळी रंगतदार करीत असे. मात्र यंदा सततच्या पावसामुळे झेंडूची वाढ अडथळ्यात आली होतीच; त्यातच सोमवारी झालेल्या पावसाने उरलेसुरले



पीकही पूर्णतः उद्ध्वस्त झाले आहे. झेंडू व्यतिरिक्त सोयाबीन पिकांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. सोयाबीनच्या शेतात पाणी साचल्याने त्या कुजण्याची शक्यता आहे. कापूस व हळद पिकांचेही मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या आशा धुळीस मिळाल्या आहेत. ''आम्ही वर्षभर झेंडू व सोयाबीन पिकांवर खर्च करून मोठ्या आशा बाळगल्या होत्या. आता ढगफुटी सदृष्य पावसाने सारेच पिकं नष्ट झाले. दिवाळीत कुटुंब कसे चालवायचे, कर्ज कसे फेडायचे हा मोठा प्रश्न आमच्यासमोर उभा राहिला आहे,'' असे शेतकरी हतबल होऊन सांगत होते.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस सलंग ८ व्या वर्षी पारितोषके

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस सलग ८ व्या वर्षी सन २०२५ करीता देशातील लहान जिल्हा सहकारी बँकाच्या वर्गवारीमधुन उत्तम संगणकीय सेवा,सुविधा कामकाजासाठी देश पातळीवरील नामांकित संस्था फ्रंटियर को-ऑपरेटिव्हबँक्सअसोसिएशन (एफसीबीए२०२५) यांच्याकडुन १८ सप्टेंबर रोजी ०२ पारितोषके गोवा-पणजी येथीलभव्य समारंभात प्रदान करण्यात आले.

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जालना बँकेला लिडरशिप अवॉर्ड - आय.टी. हेड ऑफ द ईयर व बेस्ट पेमेंट ट्रान्सफॉर्मेशन या बँकिंग संगणकीय सेवा उपलब्धता व ग्राहकांना डिजीटल पेमेंटच्यासुविधा उपलब्ध करुन दिलेल्या कामकाजासाठी फंट्रीयर को-ऑपरेटिव्ह बँक्स अवॉर्ड यादेशातील नामांकित संस्था यांनी देशभरातील ५०० पेक्षा अधिक नागरी व जिल्हा बँकांच्या



नामाकंन यादी मधुन रु. १,००० कोटी पेक्षा कमी ठेवी असलेल्या जिल्हा सहकारी बँकांच्या वर्गवारीमधुन जालना जिल्हा बँकेच्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल जालना जिल्हा बँकेची सलग ०८ व्या वर्षी सन २०२५ करीता उपरोक्त ०२ पारितोषकासाठी तज्ञ ज्युरी यांचे सकारात्मक शिफारसीनुसार निवड करुन बँकेस पारितोषके जाहीर करण्यात आले. बँकेस पणजी-गोवा येथे गोवा राज्याचे सहकार मंत्री सुभाष शिरोडकर यांच्या प्रमुख उपस्थितीसह आयोजित भव्य सोहळयामध्ये बँकेस हा सन्मान नॅशनल अर्बन को-ऑपरेटिव्ह फायनान्स अँड डेव्हलपमेंट कार्पोशन ऑफ इंडीया,नवी दिल्ली यांचे प्रमुख कार्यकारी अधिकारी प्रभात चर्तुवेदी तसेच दिमहाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे सेवा निवृत्त कार्यकारी संचालक तथा वरीष्ठ तज्ञ ज्युरी सदस्य प्रमोद कर्नाड यांच्या हस्ते पारितोषक चषक बँकेचे कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख व व्यवस्थापक दादाराव राऊत तसेच बँकेचे वरीष्ठ अधिकारी, संगणक प्रमुख व शाखा कर्मचारी प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. पारितोषक सोहळ्यास उपस्थितांचे जालना जिल्हा बँकेचे अध्यक्ष सतिश टोपे व उपाध्यक्ष भिमराव जावळे यांनी व्यक्तीशः व बँकेचे सर्व संचालक मंडळाच्या वतीने अभिनंदन केले.

## अतिवृष्टी नुकसानीचे सरसकट पंचनामे करा - खा. डॉ.काळे

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात १५ सप्टेंबर पासून सुरू असलेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरातील अनेक भागांत पाणी साचल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून ग्रामीण भागात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आता सरकारने कोणताही आदेश ना देता तात्काळ शेतकऱ्याला नुकसान भरपाईची शंभर टक्के सरसकट मदत करावी. आता शेतकऱ्याचा अंत पाहू नये शेतकऱ्यांच्या हातामध्ये तत्काळ मदत द्यावे अशी मागणी जालना जिल्ह्याचे खासदार कल्याण काळे यांनी मागणी केली आहे.

शेतीपिके, घर, जनावरे व मालमत्तेचे प्रचंड नुकसान होऊन शेतकरी व नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घेऊन बाधितांना मदत मिळावी यासाठी आज जालना जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांची भेट घेण्यात आली. यावेळी तातडीने पंचनामे करून सर्व बाधित घटकांना मदत मिळावी तसेच शासनाकडे सविस्तर अहवाल पाठवून योग्य ती नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी ठाम मागणी खासदार डॉ. कल्याण काळे साहेबांनी केली. ''अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या प्रत्येक शेतकरी व नागरिकाला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करू,'' असा ठाम निर्धार खासदारांनी व्यक्त केला. शासनाने त्वरित पावले उचलून मदतकार्य सुरू करावे, अशी सर्वानुमते मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, कल्याणजी दळे, जे. प्रकाश चव्हाण, बबलू चौधरी, अजय बनकर, त्रिंबक पाबळे, कृष्णा पडूळ, लक्ष्मण मसलेकर, श्रीरंग कामटे, राम शिरसाठ, सोपान तिरुके, ज्ञानेश्वर इंगोले, विष्णू पाटील शेजुळ आदी पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५००**

**दिनांक -२२/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शेख मुनिबोद्दीन मुहम्मद रफियोद्दिन रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख मुनिबोद्दीन मुहम्मद रफियोद्दिन | स्वतः | ०६/०२/१९७४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२२/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५१८**

**दिनांक -२२/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शमशोद्दिन तमिजोद्दिन खान रा. अंबड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शमशोद्दिन तमिजोद्दिन खान | स्वतः | २०/०४/१९७२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२२/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


## मोहरी तलाव फुटण्याचा धोका टळला!

### आमदार रोहित पवार यांच्या तत्परतेने संकटावर मात

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे मोहरी तलावाच्या सांडव्यात मोठे भगदाड पडून पाणी वाहू लागल्याने तलाव फुटण्याचा गंभीर धोका निर्माण झाला होता. या धोका टाळण्यासाठी आमदार रोहित पवार यांनी वेळ न दवडता स्वतः पुढाकार घेत तातडीने स्वखर्चातून मदत पुरवली.

कालव्याच्या सांडव्यात खच झाल्याने तलावाचे पाणी परिसरातील सोनेगाव, धनेगाव, चिंचपूर, जवळके, तरडगाव या गावांकडे झेपावण्याची शक्यता होती. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या परिस्थितीची माहिती मिळताच आमदार रोहित पवार यांनी घटनास्थळी धाव घेतली, पाहणी केली आणि प्रशासनाकडं साधनसामग्री उपलब्ध नसल्याने स्वतःच्या खर्चातून तीन पोकलँड, जेसीबी तसेच एक हजार गोणी सिमेंटची व्यवस्था करून कामाला सुरुवात केली. तलाव सुरक्षित ठेवण्यासाठी सध्या तातडीचे दुरुस्तीचे काम सुरू असून पावसाने उघडीप दिल्याबरोबर प्रशासनाच्या मदतीने कायमस्वरूपी दुरुस्तीचं काम हाती घेतले जाणार



आहे. मोहरी, खर्डा, जायभायेवाडी या गावांसाठी पाणीपुरवठ्याचं प्रमुख साधन म्हणजे हाच मोहरी तलाव. त्याचबरोबर खालील गावांतील शेतीही याच तलावावर अवलंबून आहे. जर हा तलाव फुटला असता तर नागरिकांपुढं पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न आणि शेती वसाहतींवर पूराचा मोठा धोका निर्माण झाला असता. त्यामुळे नागरिकांनी काळजी करू नये. तलाव सुरक्षित राहण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. प्रशासन आणि कार्यकर्त्यांच्या मदतीने हे काम तातडीने पूर्ण केलं जाईल अशी माहिती आमदार रोहित पवार यांनी दिली.

# माजलगाव धरणातून सिंदफना नदीपात्रात १ लाख १५ हजार क्युसेक्सने विसर्ग

## तालुक्यात पुर परिस्थिती बिकट! अनेक गावांचा संपर्क तुटला, महिला सुखरूप वाचली

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या आठवड्यापासून माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात धुवाधार पाऊस झाल्यामुळे माजलगाव तालुक्यात जिकडेतिकडे पाणीच पाणी अशी परिस्थिती झाली आहे माजलगावचे धरण भरल्यामुळे सिंदफना नदी पात्रात १ लाख १५ हजार क्युसेस विसर्ग सिंधफना नदी पात्रात सोडला आहे त्यामुळे सांडस चिंचोली गावाला पूर्ण पाण्याने वेढले असून या गावात एका महिलेची पहाटे डिलेव्हरी झाली होती सदर महिलेला सकाळी ६:०० वाजता एनडीआरएफच्या जवानांनी सुखरूप बाहेर काढले आहे.



गेल्या दोन दिवसापासून धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये भरपूर पाऊस झाल्यामुळे माजलगाव धरण हे ऑगस्ट महिन्यातच भरले होते परंतु गेल्या दोन दिवसापासून पाऊस जास्त झाल्यामुळे माजलगावच्या धरणातून सिंधफना नदीपात्रामध्ये सकाळी ८:०० वाजल्यापासून एक लाख १५ हजार क्युसेस पाण्याचा विसर्ग सिंदफणा नदी पात्रात झाला आहे त्यामुळे सिंदफणा नदी पात्राच्या गावांना प्रशासनाच्या वतीने सावधानतेचा इशारा देण्यात आला होता परंतु सांडस चिंचोली या गावाला पाण्याने पूर्ण वेढल्यामुळे गावाचा संपर्क तुटला आहे.या गावात एका महिलेची पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास डिलिव्हरी झाली होती सदर महिला व बाळ सुखरूप बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफच्या जवानांनी सकाळी तिथे जाऊन महिलेला व बाळाला सुखरूप बाहेर काढले आहे या एन.डी आर एफ च्या जवानांच्या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे या पावसामुळे सिंधफाना व गोदावरी नदीला पूर आल्यामुळे माजलगावच्या जुन्या पुलावरून पाणी जात आहे तर तालुक्यातील गोदावरी नदीला महापूर आल्यामुळे सावंगीच्या पुलावरून पाणी जात आहे त्यामुळे माजलगाव-आष्टी चा संपर्क तुटला आहे या दोन दिवस झालेल्या पावसामुळे माजलगाव तालुक्यातील सिंदफणा नदीकाठच्या व गोदावरी काठचे अनेक गाव हे पाण्याखाली गेले आहेत मराठवाड्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री मोरेश्वर मंदिरही पाण्याखाली गेलेले आहे.त्यामुळे माजलगाव तालुक्यातील अनेक गावांचा संपर्क तुटला असुन अनेक गावांत पाणी शिरल्याने पुर परिस्थिती बिकट झाली आहे.सध्या प्रशासनाच्या वतीने गोदावरी व सिंधफना नदीकाठच्या लोकांना सावधानतेचा इशारा देण्यात आलेला आहे.तसेच अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास दोन एन.डी.आर.एफ घ्या दोन तुकड्या माजलगाव मध्ये दाखल झालेल्या आहेत.

## सुरूमगावात पुराच्या पाण्याचे थैमान,संसार उघड्यावर

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव व पैठण धरणाचे पाणी गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर सोडल्याने गोदावरी नदीकाठी असलेल्या सुरुमगाव परिसरात पुराच्या पाण्याने धुमाकूळ घातला असून,परिसरातील गावात मोठ्या प्रमाणावर पाणी शिरले आहे,यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत, सुरूमगावात संपूर्ण गावात पाणी घुसले असून पुराचे घरात पाणी शिरले आहे, घरातील संपूर्ण वस्तू पाण्यात वाहत जात आहेत,अनेक मार्ग बंद झाले आहेत अशी परिस्थिती सर्वत्र दिसत आहे.



दोन दिवसापासून पडत असलेल्या मुसळधार पावसानंतर माजलगांव धरणातुन १ लाख १५ हजार क्यूसेक्स व पैठण धरणातुन १ लाख ३ हजार क्युसेक्स असा गोदावरी व सिंदफणा नदी पात्रात २ लाख १८ हजार क्यूसेक्स पाण्याचा विसर्ग सुरू आहे.यामुळे माजलगाव तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या सुरूमगांव,सरवर पिंपळगाव, आबेगाव,बोरगाव सांडस चिंचोली, गंगामसला,सोन्नाथडी,गुंजथडी,शुक्ल तिर्थ लिमगाव,मोगरा, डाके पिंपरी,खतगव्हाण इत्यादी गावांना पुराच्या पाण्याचा वेढा पडला आहे.गावातील अनेकांच्या घरात पाणी शिरले असुन मोठी पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे पान २ वर



पो ठा शिरूर कासार हद्दीतील ब्रम्हनाथ येळंब हद्दीतील वणवे वस्ती येथे अंदाजे ५० ते ६० नागरिक व ३०-४० शेळ्या पुरा मध्ये अडकल्याने संपर्क तुटला होता सर्व नागरिकांना बिट अंमलदार पोह तुषार गायकवाड व बिट मदतनीस सुनील बहिरवाल यांनी सुरक्षित स्थळी स्थलांतरित केले आहे.

## चौसाळासह घाटमाथ्यावर मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे स्वप्न उद्ध्वस्त

चौसळा । प्रतिनिधी

घाटमाथ्यावर तीन दिवसांपासून ९५.५ मि मि.दोन तासात कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने चौसळा परिसरासह पिंपळगाव,वाडवना हिंगणी माळवाडी रूईगवाहन या गावांचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. नद्यांना पूर आला, नाले तुडुंब भरले, आणि शेतकऱ्यांचे मेहनतीचे पीक काही क्षणांत पाण्याखाली गेले.




शेतकऱ्यांनी आशेने उभे केलेले सोयाबीन, कापूस, मका,ऊडीद मुग या पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. जिथे हिरवाई डुलत होती, तिथे आता फक्त चिखल आणि पाण्याचा अथांग सागर दिसतो. ''पेरणीपासून आजवर आम्ही कर्ज काढून, दिवसरात्र कष्ट केलेपण या पावसाने सर्व काही वाहून नेलं,'' अश्रू ढाळत अनेक शेतकरी बोलून दाखवत होते.काही ठिकाणी तर शेतांतील बांध वाहून गेले व जनावर वाहून गेले ,चारा देखील पाण्यात मिसळला आहे. रस्त्यांवर पाणी ओसंडून वाहत असल्याने गावांतील संपर्क तोडला गेला आहे.स्थानिक प्रशासनाने तातडीने पंचनामे सुरू केले आहेत; पण शेतकऱ्यांच्या मनातील जखम भरून काढणे मात्र कठीण आहे. तहसीलदार कार्यालयाकडून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.''आमच्या डोळ्यांपुढे पिकं बुडताना पाहणं म्हणजे स्वतःचं आयुष्य वाहून जाताना पाहण्यासारखं आहे,'' असे डोळ्यांत पाणी आणत वृद्ध शेतकरी सांगत होते.सरकारने तातडीने आर्थिक मदत, बी-बियाण्यांचा पुरवठा आणि कर्जमाफी यांची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## सिरसमार्ग मोसंबी 'हब'ला महापुराचा तडाखा

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग व परिसराला सिंदफणा, डोंबरी व विद्रुपा या नद्यांना आलेल्या महापुराने जोरदार तडाखा दिला. सिरसमार्ग परिसराची मराठवाड्यात मोसंबी हब म्हणून ओळख आहे. या मोसंबी पिकासह कापूस, सोयाबीन, ऊस, तूर आदी पिके भूईसपाट झाली आहेत. काही शेतकर्यांची जनावरेही महापुरात वाहून गेली आहेत. या आस्मानी संकटाने हातातोंडाशी आलेली पिके वाया गेल्याने शेतकरी बळीराजा मोठ्या संकटात सापडला आहे.





सिरसमार्गसह परिसरातील तरटेवाडी, काळेवाडी, दिमाखवाडी, टाकळगव्हान, मानकापूर, शहाजानपूर, लोळदगाव, अनकोटा, पारगाव, तांदळवाडी यासह इतर गावांमध्ये दोन हजारपेक्षा अधिक एकरवर मोसंबी फळबागा आहेत. या भागातील शेतकरी आधुनिक शेती करीत असल्याने फळ व उत्पादन चांगले निघते. यामुळे या भागातील मोसंबी फळाला मार्केटमध्ये चांगली मागणी आहे. सध्या मोसंबी पीक तोडणीला आले असून या परिसरात पान २ वर

## संपूर्ण गेवराई मतदारसंघात भयंकर पूरस्थिती

### शेतकऱ्यांना तात्काळ मदतीची गरज - बदामराव पंडित

गेवराई । प्रतिनिधी

गेल्या आठ ते दहा दिवसापासून झालेल्या मुसळधार पाऊस आणि ढगफुटी सदस्य पावसाने संपूर्ण गेवराई विधानसभा मतदारसंघात भयंकर पूर परिस्थिती निर्माण झाली आहे यामुळे सगळ्याच शेतकऱ्यांचे सगळेच पीक उध्वस्त झाले आहे. विकास सोबत अनेक ठिकाणी शेतजमीन वाहून गेली आहे घरे पाण्याखाली गेलेली आहेत अशा स्थितीत शेतकऱ्यांना सरकारने तातडीने भरीव मदत करण्याची नितांत



गरज असल्याचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी म्हटले आहे.

यावर्षी मे महिन्यापासून ते सप्टेंबर पर्यंत गेवराई विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावात मुसळधार पाऊस झाला आहे. त्यातच सप्टेंबर मध्ये १३ तारखेपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे बहुतांश गावातील तलाव भरले असून सांडव्यावरून पाणी वाहत आहे वडे नद्या नाल्यांना पूर आले आहेत. त्यातच गेवराई तालुक्याच्या उत्तरेकडील पैठणच्या नाथसागरातून गोदावरी पात्रात तर दक्षिणेकडील सिंदफणा नदीत पूर परिस्थिती आल्याने दोन्ही नद्या दुथडी वाहत आहेत. यामुळे दोन्ही नद्यांच्या पात्रालगत असलेल्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून पूर परिस्थिती निर्माण झाली आहे.





**माजलगाव:- बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी माजलगाव तालुक्यातील गोदावरी काठच्या गंगामसला गावाला भेट देऊन उद्भवलेल्या पुर परिस्थितीचा गंगामसला गावचे सरपंच पती भालचंद्र सोळंके यांच्याकडून आढावा घेतला.यावेळी माजलगावचे उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले,तहसीलदार संतोष रुईकर,ग्राम महसुल अधिकारी रुपचंद आभारे,माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालक कोळी गंगामसला येथील ग्रामस्थांची उपस्थीती होती.**

## म्हाळसजवळा परिसरात पिकांचे प्रचंड नुकसान

### सोयाबीन पाण्यात बुडाले, कापसाची मुळंही सडली

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील म्हाळस जवळा परिसरात शेतात पाणी घुसल्याने पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून सोयाबीन पीक संपूर्ण पाण्यात बुडाले आहे. वाऱ्यामुळे बाजरी पडल्याने बाजरीचे मोठे नुकसान झाले असून या भागात असलेले महत्त्वाचे कापसाचे पीक याच्या मुळाला पाणी लागल्याने मुळे सडू पान २ वर



## कांबळी नदीचा पूल पडला, नऊ दिवसापासून वाहतूक बंद

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा समाजसेवक श्री परमेश्वर रामचंद्र घोडके याविषयी सविस्ते माहिती अशी की, सुलेमान देवळा गावातील कांबळी नदी पूल, गेल्या नऊ दिवसापासून वाहून गेला असून, हा देवस्थाने रस्ता असल्याकारणाने, वृद्धेश्वर देवस्थान व मच्छिंद्रनाथ देवस्थान येथील भाविक भक्तांचे मोठे हाल होत आहेत. तसेच गावातील दूध व्यवसाय शेती व्यवसाय, व विद्यार्थ्यांचे जीवन विस्कळीत झाले आहे. या रस्त्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून ६०० कोटीचा निधी मंजूर असून सुद्धा गेल्या दोन वर्षापासून या नवीन पुलाचे काम अद्याप सुरू केलेले नाही. लोकप्रिय आमदार सुरेश आण्णा



धस यांनी या नदी पात्रातील पुलाचे काम लवकर करून घ्यावी अशी मागणी सुलेमान देवळा गावचे समाजसेवक श्री. परमेश्वर घोडके यांनी केली आहे. व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी तात्पुरता पुलाची दुरुस्ती करून जन जिवन पूर्व पदावर करावे अशी मागणी यावेळी करण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांना १० हजार रु.ची सरसकट मदत करावी-धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदार संघातील २१ महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे एक लाख एकरापेक्षा जास्त पिकांचं अंदाजे ४०० ते ५०० कोटी रु चे नुकसान झाले असल्याचा अंदाज आहे.ज्या संपुर्ण जमिनी वाहून गेल्या आहेत.त्यांना हेक्टरी दोन लाख रूपये मदत दिवाळीच्या आत द्यावी तसेच माझी एक महिन्यांची पेन्शन मी मदत म्हणून



जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करणार असल्याचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले. आष्टी येथील भगवान महाविद्यालयात माजी आ.भीमराव धोंडे यांनी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावर्षी भयानक पाऊस झाला आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तर सरकारने सरसकट ज्यांच्या जमिनी पुर्ण वाहून गेल्या आहेत. त्यांना हेक्टरी दोन लाख रुपये अनुदान तर ज्या शेतकऱ्यांच्या विहीरी पान २ वर

## डॉ.योगेश क्षीरसागर शेतकऱ्याच्या बांधावर : धिर देत गाऱ्हाणे ऐकले

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघातील हिंगणी खु., चौसाळा, वाढवणा पूल, बोरखेड, शिंदेवस्ती पूल (बोरखेड) आदी गावांमधील पूरग्रस्त भागात मंगळवारी (दि. २३) राष्ट्रवादी काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पाहणी केली. याच वेळी डॉ.सारिका क्षीरसागर यांनीही बीड व शिरूर कासार तालुक्यातील काही गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. दाम्पत्याने थेट बांधावर जाऊन शेतकऱ्यांना धीर दिला.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात पिकांचे



मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेती उभी करणे कठीण झाले आहे. या नुकसानीची माहिती डॉ. क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना सादर केली आहे. आज (दि.२४) अजितदादा पवार यांचा दौरा होण्याची शक्यता असून ते प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. तातडीने मदत पान २ वर

### 'कल्पतरू'चा दांडिया कार्यक्रम पुढे ढकलला

जिल्ह्यातील सलग पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असल्याने बीड शहरातील 'कल्पतरू' आयोजित 'नवजलसा दांडिया' कार्यक्रम पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा कार्यक्रम २५ सप्टेंबर रोजी होणार होता. नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाईल, अशी माहिती सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांनी दिली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...



# ३० सप्टेंबरपूर्वी कर भरल्यास थेट ४ टक्के सवलत, लाभ घेण्यासाठी फक्त ७ दिवस बाकी

## पिंपरी चिंचवड महापालिकेचे मालमत्ताधारकांना कर भरण्याचे आवाहन

**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत नागरिकांना मालमत्ता कर वेळेत भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. चालू वर्षासाठी मालमत्ता कर ऑनलाइन पद्धतीने ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी भरल्यास सामान्य करावर थेट चार टक्के सवलत मिळणार असून, हा लाभ घेण्यासाठी आता केवळ ७ दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. ज्यांनी ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी कर भरला नाही, त्यांना प्रत्येक महिन्याला दोन टक्के विलंब दंड भरावा लागणार आहे. त्यामुळे नागरिकांनी ३० सप्टेंबरपूर्वी त्वरित कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.**

१ एप्रिल २०२५ ते २२ सप्टेंबर दरम्यान महापालिकेला ५९५ कोटी २४ लाख रुपयांचा मालमत्ता कर संकलित झाला आहे. शहरात ७ लाख २६ हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक मालमत्ता असून, त्यापैकी ४ लाख ६१ हजार ५०३



मालमत्ताधारकांनी चालू वर्षातील मालमत्ता कराचा भरणा केला आहे. यामध्ये ऑनलाइन मालमत्ता कर भरून सवलतीचा लाभ घेणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या ३ लाख ८० हजार ९४९ आहे.

कर वसुलीसाठी १८ विभागीय कार्यालयांमार्फत कामकाज सुरू आहे. ऑनलाइन पद्धतीने किंवा ॲपच्या माध्यमातून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

> पिंपरी चिंचवड महापालिकेने कर भरण्यासाठी नागरिकांना ऑनलाइन, मोबाईल ॲप आणि १८ विभागीय कार्यालयांद्वारे सोयीस्कर सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या संधीचा लाभ घेऊन वेळेत कर भरल्यास आपण केवळ सवलतीचाच फायदा घेत नाही, तर शहराच्या विकासात आपले मोलाचे योगदान देतो.
>
> – प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

### थकबाकीदारांवर कडक कारवाई होणार

२५ हजार रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या मालमत्ताधारकांवर महापालिकेकडून कडक कारवाई करण्यात येणार आहे. यामध्ये बिगर निवासी मालमत्ताधारकांची वाहन जप्त करणे, नळ कनेक्शन खंडित करणे तसेच बिगर निवासी मालमत्ताधारकांची थकीत मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना कर आकारणी व कर संकलन आढावा बैठकीत अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिल्या. महापालिकेच्या उत्पन्नाचा मोठा हिस्सा मालमत्ता करातून येतो आणि नागरिकांनी जबाबदारीने वेळेत कर भरल्यास शहरातील विकासकामांना वेग येईल. थकबाकीदारांनी विलंब न करता कर भरावा, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येणार, असेही त्यांनी स्पष्ट केले.

> **मालमत्ता कर हे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या महसुलाचे प्रमुख साधन आहे. नागरिकांनी वेळेत कर भरल्यास महापालिकेला विकासकामांना गती देता येईल आणि नागरिकांसाठी आणखी सुविधा निर्माण करता येतील. नागरिकांनी ही संधी गमावू नये आणि ३० सप्टेंबर २०२५ पूर्वी कर भरून चार टक्क्यांच्या सवलतीचा लाभ घ्यावा. – शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

# रांजणगावसह पुण्यातील 'या' ग्रामपंचायतींवर प्रचंड ताण, उपमुख्यमंत्री अजित पवारांचे महत्वाचे निर्देश

पुणे । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील रांजणगाव गणपतीसह कारेगाव, ढोकसावंगी आणि हिवरे ग्रामपंचायतींमध्ये पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण आला आहे. रांजणगाव गणपती गावाची लोकसंख्या मूळची अवघी ११ हजार असली तरी लगतच्या एमआयडीसी क्षेत्रामुळे स्थलांतरित लोकसंख्या तब्बल दोन लाखांवर पोहोचली आहे. या वाढलेल्या लोकसंख्येमुळे पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्ते आणि इतर सुविधा कोलमडू लागल्या आहेत. या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करण्याचे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित विभागांना दिले.



रांजणगाव गणपती, कारेगाव, ढोकसावंगी, हिवरे या ग्रामपंचायतींच्या हद्दीतील विविध प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आमदार दिलीप वळसे-पाटील, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन, ग्रामविकास आणि नगरविकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पुण्याचे विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे सीईओ, पीएमआरडीएचे आयुक्त यांच्यासह एमआयडीसीचे वरिष्ठ अधिकारी देखील व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले.

रांजणगाव गणपती हे अष्टविनायकांपैकी एक महत्त्वाचे स्थान आहे. दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. शिवाय गावाच्या लगत एमआयडीसी क्षेत्र असल्याने स्थलांतरित लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. अशा पार्श्वभूमीवर गावातील पायाभूत सुविधा सक्षम करणे ही अत्यावश्यक गरज आहे. पवारांनी स्पष्ट निर्देश दिले की, या भागातील वाढती लोकसंख्या आणि भाविकांचा ओघ लक्षात घेऊन एमआयडीसीने विकास कामे करताना जिल्हा परिषदेशी समन्वय साधावा. तसेच रस्ते, पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, जलनिस्सारण यासारख्या मूलभूत सोयींसाठी तातडीने निधी आणि कामे सुरू करावीत, असे निर्देश देण्यात आले. गावांचे प्रतिनिधी, सरपंच व पदाधिकाऱ्यांनी या बैठकीत आपले प्रश्न थेट मांडले. त्यांनी वाढत्या लोकसंख्येला तोंड देताना पाणीपुरवठा योजना कोलमडत असल्याचे, रस्ते चिखलमय झाल्याचे, कचऱ्याचे ढिग वाढत असल्याचे सांगितले. यावर अजित पवारांनी संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना सुरू करा असे आदेश दिले.बैठकीत ग्रामपंचायतींच्या प्रतिनिधींनी पायाभूत सुविधांबाबत अडचणी मांडल्या. त्यावर अजित पवारांनी प्रशासनाला वेगवान कारवाई करण्याचे आदेश दिले. गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करावे असेही ते म्हणाले. या बैठकीला संबंधित ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, स्थानिक नेते आणि अधिकारी उपस्थित होते. पावसामुळे व लोकसंख्येच्या ताणामुळे निर्माण झालेल्या समस्या लवकर सोडविण्यात येतील, अशी आशा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# बारामतीत जुन्या भांडणाच्या कारणातून पाच जणांवर कोयत्याने वार

बारामती । प्रतिनिधी

बारामती तालुक्यातील वंजारवाडीमध्ये जुन्या भांडणाच्या कारणातून पाच जणांवर कोयत्याने वार झाले आहेत. घटस्थापनेदिवशी रात्री साडे आठच्या सुमारास वंजारवाडी येथील दत्त मंदिर समोर ही घटना घडली आहे. याप्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात अमोल अण्णा चौधरी याच्या फिर्यादीवरून पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऋतिक उर्फ गुड्या मुळिक, ओम अर्जुन कुचेकर,अली मुजावर, दिपक भोलनकर आणि शुभम वाघ यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेनंतर शुभम वाघ,अली मुजावर आणि ओम अर्जुन कुचेकर या तिघांना बारामती तालुका पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. तर या हल्ल्यामध्ये सुनिल चौधर,अमोल चौधर, भारत चौधर, सागर चौधर आणि आदित्य चौधर हे पाच जण जखमी झाले आहेत.

पोलिसात दिलेल्या तक्रारी नुसार,सोमवारी २२ सप्टेंबर रोजी फिर्यादी अमोल आण्णा चौधर, भारत गोकुळ चौधर, सागर चंद्रकांत चौधर, आदित्य सर्जेराव चौधर, सुनिल गोरख चौधर हे सर्व व इतर नवरात्र उत्सव चालू असल्याने देवीची ज्योत राशीन येथून मौजे वंजारवाडी येथे दत्त मंदिरासमोर घेऊन आले. मंदिरासमोर पुजा पाठ करून पारंपारिक वाद्यावर उत्सव साजरा करीत होते. त्याचवेळी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास एक चारचाकी त्या



ठिकाणी आली. त्यामधुन ऋतिक उर्फ गुड्या मुळिक, ओम कुचेकर, अली मुजावर ,दिपक भोलनकर आणि शुभम वाघ व त्यांचेसोबत असणारे दोन ते तीन अनोळखी इसम होते. त्यांच्या हातात लोखंडे कोयते आणि चाकू अशा पद्धतीची हत्यारे होती. आणि त्यानंतर या व्यक्तींनी दत्त मंदिरासमोर उभा असणाऱ्या फिर्यादी यासह त्यांच्या बंधुंवर हल्ला चढवला यामध्ये पाच जण गंभीर जखमी झाले. यानंतर बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# झोळीची 'एम्ब्युलन्स'! ९२ वर्षांच्या आजीला रस्त्याअभावी पायपीट करत रूग्णालयात केलं दाखल

भोर । प्रतिनिधी

तालुक्यातील म्हसर बुद्रुकमधील राखीचा माळ धनगर वस्ती येथील ९२ वर्षाच्या आजी सगाबाई विठ्ठल बर्गे यांना ताप, थंडी येऊन आजारी पडल्या. परंतु रस्त्याची सोय नसल्यामुळे ग्रामस्थांच्या मदतीने चादरीची झोळी करून २ किलोमीटर पायपीट करीत रस्त्यापर्यंत आणून तेथून खासगी वाहनाने त्यांना निगुडघर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.म्हसर बुद्रुक धनगर वस्ती येथे रस्त्याअभावी अनेक रुग्णांचे हाल होत असून त्यांना झोळी करून पायपीट करीत दवाखान्यापर्यंत आणले जात आहे.

सगाबाई विठ्ठल बर्गे यांना ताप आणि थंडी जाणवू लागल्यामुळे अशक्तपणा देखील जाणवू लागला होता. त्यामुळे त्यांना चालणे अशक्य झाल्यामुळे आजीचा नातू अजित बर्गे तसेच अजय शिंदे आणि सुनबाई कोंडाबाई बर्गे, आरती शिंदे यांनी झोळी करून आजीला दवाखान्यात आणले. उपचार करून पुन्हा घरी नेण्यात आले.म्हसर बुदुक येथील ग्रामपंचायत सदस्य दिनेश शिंदे यांनी रस्त्यासंबंधी तहसीलदार, प्रांत, गटविकास अधिकारी तसेच जिल्हाधिकारी कार्यालय यांना लिखित स्वरूपात प्रसारित केलेल्या वृत्तांची कात्रणे जोडून एक ते दीड महिन्यापूर्वी निवेदन देण्यात आले होते. अजूनही निवेदनाची दखल गेली नसून निवेदनाची दखल घेऊन रस्त्याची मागणी पूर्ण करावी, अशी मागणी सदस्य दिनेश शिंदे यांनी तसेच ग्रामस्थांनी केली आहे.

# तृतीयपंथीयांसाठी चारचाकी वाहन प्रशिक्षण योजनेस स्थायी समितीची मंजुरी

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

**पिंपरी । प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत तृतीयपंथी घटकांच्या सक्षमीकरणासाठी व समाजात त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले जात आहेत. याच अनुषंगाने तृतीयपंथी घटकांना चार चाकी हलके वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्याची योजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेला स्थायी समितीच्या आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे तृतीयपंथी घटकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील.**

पिंपरी चिंचवड महापालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला.या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत पिंपरी चिंचवड महापालिका शाळांमध्ये शून्य कचरा प्रकल्प, स्वच्छ सन्मान सोहळा व स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ ची पूर्वतयारी साठी प्रॉडक्शन मॅनेजमेंट कामकाज खर्चास मान्यता देणे, यशवंतराव स्मृती रुग्णालय येथे पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणेबाबत व त्या संदर्भातील शैक्षणिक शुल्क महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिक यांना अदा करणे, ब क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील मलनि:सारण नलिका मॅनहोल चेंबर्सची साफसफाई आधुनिक यांत्रिकी पद्धतीने करणे या कामास मुदतवाढ देणे, नवीन जिजामाता रुग्णालय येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडील नोंदणीसाठी केलेल्या अर्जाची कंन्सेन्ट ऑथरायझेशन फी व तपासणीनंतर महामंडळाकडून कळविलेल्या पेनल चार्जेस भरणे, नवीन जिजामाता रुग्णालयासाठी लिथियम पॉलिमर बॅटरी साहित्य खरेदी करणे, प्रभाग क्रमांक २ कुदळवाडी परिसरातील डीपी रस्ते विकसित करण्यासाठी चालू विकास कामांच्या सुधारित अंदाजपत्रकात मान्यता देणे, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात महापालिकेतर्फे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी डुडूळगाव येथे निवासी गाळे बांधणे यासह विविध ३९ विषयांना मान्यता देण्यात आली. याशिवाय स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांच्याकडील ठराव महापालिका सी एस आर अंतर्गत नोंदणी करण्यास मान्यता देणे, तृतीयपंथी घटकांना चार चाकी हलके वाहन चालविण्याच्या ड्रायव्हिंग प्रशिक्षण योजना राबविणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# शिवरे गावात राजगड पोलिसांची मोठी कारवाई; ६१ लाखांचा अवैध गुटखा जप्त

भोर । प्रतिनिधी

भोर तालुक्यातील शिवरे गावच्या हद्दीत पुणे-सातारा महामार्गावर अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्या ट्रकवर राजगड पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ६१ लाख २७ हजार ८४० रुपयांचा अवैध गुटखा जप्त केला आहे. तसेच ट्रक चालकाला अटक करण्यात आली आहे.


राजगड पोलीस स्टेशनला गुप्त माहिती मिळाली होती की, शिवरे गावाजवळील राजस्थानी ढाबा येथे अवैध गुटखा वाहतूक करणारा ट्रक उभा आहे. त्यानुसार पोलिसांनी तातडीने छापा टाकला असता. सदर ठिकाणी एम.एच. ०४ जे.यू. ११३९ क्रमांकाचा ट्रक उभा होता. ट्रक चालकाची विचारपूस केली असता त्याने कोणतीही माहिती दिली नाही. मात्र ट्रक मधून गुटख्यासारखा उग्र वास येत असल्याचे दिसून आले. यानंतर ट्रक पोलिस स्टेशनमध्ये आणून पंचासमक्ष तपासला असता, ट्रक मधून राजनीगंध पान मसाला आणि तुलशी या गुटख्याचा मोठा साठा आढळून आला. या मालाची एकूण किंमत ६१ लाख २७ हजार ८४० रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणात अश्वनी कुमार त्रिपाठी (रा. मुंबई, मुळ रा. उत्तर प्रदेश) या ट्रक चालकाला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर राजगड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक राजेश गवळी, पोलीस उपनिरीक्षक अजित पाटील यांच्यासह पोलीस कर्मचारी सहभागी झाले आहेत. या कारवाईसाठी पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक (बारामती विभाग) गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी (भोर विभाग, सासवड) राजेंद्रसिंह गौर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास राजगड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक अजित पाटील करत आहेत.

# भगरीच्या पिठाच्या भाकरी खाल्ल्याने विषबाधा; बारामती तालुक्यातील घटना

बारामती । प्रतिनिधी

सद्या नवरात्रीचा उत्सव सुरु आहे. या नवरात्री उत्सवाच्या दरम्यान महिला-पुरुष नऊ दिवस उपवास करत असतात. उपसादरम्यान, महिला पुरुष अनेक उपवासाचे पदार्थ घरी आणून खात असतात. यामध्ये भगरिच्या पिठाच्या भाकरी जास्त प्रमाणात खाल्या जातात. याच भगरीच्या पिठाच्या भाकऱ्या खाल्ल्याने बारामती तालुक्यातील झारगडवाडी गावातील आठ महिला व पुरुषांना चक्कर, उलट्या, पोटदुखी, असे त्रास चालू झाले आहेत.

भगरीच्या पिठाच्या भाकऱ्या खाल्याने विषबाधा झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. यातील दोन महिलांना जास्त त्रास होत असल्याने त्यांना बारामतीतील एमआयडीसी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर उपचार सुरु असून रुग्णांच्या सर्व



प्रकारच्या टेस्ट घेतल्या असून त्याचा रिपोर्ट आल्यानंतरच नेमकं निदान समोर येणार आहे. रुग्णांनी झारगडवाडी गावातील एका किराणा दुकानातून भगरीचे पीठ आणून भाकरी खाल्ल्यामुळे चक्कर उलट्या आणि पोटदुखीचा त्रास झाला असा रुग्णांच्या नातेवाईकांनी आरोप केला. यामुळे या किराणा दुकानावर अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्याने मंगळवारी रात्री आठ वाजता धाड टाकली. यामध्ये सर्व भगरीचे पीठ अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यानी तपासणीसाठी ताब्यात घेतले आहे.भगरीचे पीठ हे जास्त दिवसाच्या असण्याची शक्यता आहे. यामुळे भगरीचे पीठ व पाणी मिक्स झाल्यानंतर बॅक्टेरिया तयार झाला असल्याचा व्यक्त करण्यात येत आहे. यामुळे महिला व पुरुषांना डोकेदुखी उलटया आणि पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याचा अंदाज आहे. भगरीचे पीठ हे तपासणीसाठी लॅबला पाठवण्यात येणार आहे. सध्या तरी झारगडवाडी गावातील धाड टाकलेल्या किराणा दुकानातून खरेदी केलेल्या भगरीच्या पिठाच्या भाकऱ्या खबरदारी म्हणून महिला व पुरुष नागरिकांनी खाऊ नये, असे आव्हान अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.

# कामगाराचा वेश, चोरीची योजना ; केबल चोरांची टोळी जेरबंद,३० लाखांचा मुद्देमाल

पुणे । प्रतिनिधी

दूरसंचार विभागाची (बीएसएनएल) केबल चोरणाऱ्या परप्रांतीय चोरट्यांच्या टोळीला चतु:शृंगी पोलिसांनी गजाआड केले. चोरट्यांकडून टेम्पो, रिक्षा, एक क्रेन, केबल, महापालिकेतील बिगारी कामगार वापरत असलेले हेल्मेट, रिफ्लेक्टिंग जॅकेट, लाइट बॅटन, लोखंडी कठडा, हातोडा, करवत, पहार असा ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. चोरट्यांनी कामगारांसारखी वेशभूषा करून केबल चोरल्याचे तपासात उघडकीस आले आहे.

नसरुल बिलाल मोहम्मद (२३, रा. फाजलपूर, लक्ष्मीनगर, नवी दिल्ली) संजीव कुमार श्रीसेवाराम वर्मा (३७, रा. साऊथ गणेशनगर, नवी दिल्ली), फईम अहमद शरीफ अहमद शेख (वय ४२, रा. लोहगाव, पुणे), वारीस फकीर मोहम्मद (वय ३५, रा. फाजलपूर, लक्ष्मीनगर, नवी दिल्ली) अशी चोरट्यांची नावे आहेत. औंध भागातील परिहार चौकात बीएसएनएलकडून भूमिगत वाहिनीचे काम सुरू होते. १७ सप्टेंबर रोजी मध्यरात्री कामगारांसारखी वेशभूषा करून चोरट्यांनी केबल चोरून नेली.

हा प्रकार उघडकीस आल्यानंतर बीएसएएनएलच्या अभियंत्यांनी चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानंतर पोलिसांनी तपास करून चोरट्यांच्या टोळीला येरवड्यातील संगमवाडी भागात पकडले. पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, सहायक आयुक्त विठ्ठल दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक आश्विनी ननावरे, सहायक पोलीस निरीक्षक अनिकेत पोटे, श्रीधर शिर्के, इरफान मोमीन, श्रीकांत वाघवले, बाबूलाल तांदळे, बाबासाहेब दांगडे, वाघेश कांबळे, तुषार गिरमे यांनी ही कामगिरी केली.

# आंदेकर टोळीच्या धंद्यावर महापालिकेची धडक! सत्तेच्या सावलीत वाढलेले साम्राज्य जमीनदोस्त

**पुणे । प्रतिनिधी**

**आयुष कोमकरच्या खुनानंतर पोलीस, महापालिका प्रशासनाने जोरदार कारवाईला सुरुवात केली आहे. पोलीस प्रशासनाने आंदेकर कुटुंबीयांच्या आर्थिक नाड्या आवळण्यास सुरुवात केली आहे, तर महापालिकेने त्यांनी हफ्त्यासाठी सुरू केलेल्या अनधिकृत व्यवसायांच्या साम्राज्यावर हातोडा मारायला सुरुवात केली आहे. सोमवारीही काही अनधिकृत शेड्स आणि फ्लेक्स महापालिकेने काढून टाकले. मात्र, पालिकेने याबाबत अधिकृतरीत्या कोणतीही प्रतिक्रिया किंवा माहिती दिली नाही.**

अनधिकृत मासळी बाजार पाडल्यानंतर सोमवारी आंदेकरांच्या प्रभावक्षेत्रात अतिक्रमण कारवाई करण्यात आली. येथील टपऱ्या, स्टॉल, शेड्स, अनधिकृत फलक पाडले. आंदेकर कुटुंब नाना पेठेत वास्तव्यास असून, या परिसरातील व्यापाऱ्यांकडून, पथारी व्यावसायिकांकडून खंडणी वसूल केल्याचा आरोपही आंदेकर टोळीवर असून, तसे तपासातूनही समोर आले आहे.या परिसरात आंदेकरांचे अनधिकृत मार्केट, फ्लेक्स, टपऱ्या आहेत.यामुळे वाहतुकीला अडथळा होत असल्याची कल्पना असूनही महापालिकेच्या भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय, मुख्य अतिक्रमण विभाग, आकाशचिन्ह परवाना विभाग, बांधकाम विभागाने एवढी वर्षे कारवाई केली नाही. मात्र, मागील



आठवड्यात पोलिसांनी आंदेकरांच्या मासळी बाजारावर हातोडा मारला. त्यानंतर पालिकेने सोमवारी येथील अनधिकृत फ्लेक्स, टपऱ्या, शेड पाडून टाकल्या.मात्र, महापालिकेच्या अतिक्रमण किंवा बांधकाम विभागाने या कारवाईची माहिती न देता हा नियमित कारवाईचा भाग असल्याचा भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे एरवी छोट्या- मोठ्या कारवाईनंतर प्रसिद्धिपत्रक काढणाऱ्या पालिकेने याबाबत का मौन बाळगले, याची चर्चा सुरू आहे.